# रोमकरांस

# रोमकरांस

## 1

1 पौलाकडून जो येशू ख्रिस्तांची सेवा करणारा प्रेषित आहे परमेश्वराच्या येशूवार्तेकरिता वेगळा केला गेलेला, 2 ज्याची
प्रतिज्ञा परमेश्वराने पवित्र बायबलमध्ये संदेष्टयांद्वारे पूर्वीपासूनच केलेली होती. 3 ही प्रतिज्ञा परमेश्वराचा पुत्र येशू ख्रिस्त
यांच्याविषयी केली होती. शारीरिक स्वरूपात पाहिल्यास येशू दावीद वंशाचे होते, 4 येशूंच्या मेलेल्यांतून जिवंत
उठण्याविषयी पाहिल्यास पवित्र आत्म्याच्या शक्तिनुसार येशू ख्रिस्त परमेश्वराचा पुत्र असण्याची घोषणा केली गेली.
5 जेणेकरून ज्यांच्याद्वारे आपण मोठी कृपा (अनुग्रह) आणि प्रेषित पद प्राप्त (मिळविले) केले आहे, त्या येशूंच्या
नांवाकरिता सबंध जगात विश्वासाच्या आज्ञापालनाद्वारे शिष्य केले जावेत. 6 तुम्ही पण त्यांच्यापैकीच आहा अर्थात ते
ज्यांना येशू ख्रिस्तांचे होण्यासाठी बोलाविलेलेही आहे.
7 रोम येथे राहणाऱ्या त्या सर्वांना, ज्यांच्यावर परमेश्वर प्रेम करितो आणि जे पवित्र (संत) म्हणविले जातात, आपला
पिता परमेश्वर आणि स्वामी येशू ख्रिस्त यांच्यापासून निरंतर (अविरतपणे) कृपा आणि शांति असो.
8 संपूर्ण जगभर तुमच्या विश्वासाची चर्चा होते आहे, म्हणून सर्वप्रथम मी तुम्हां सर्वांकरिता येशू ख्रिस्तांद्वारे परमेश्वराचे
आभार मानतो. 9 परमेश्वर ज्याची सेवा मी आपल्या आत्म्याने त्याचा पुत्र येशूंच्या कार्यात करितो, या गोष्टीचा साक्षी आहे
की न थांबता (निरंतर) मी कशा प्रकारे आपल्या प्रार्थनेत तुमची आठवण करीत असतो. 10 मी ही विनंती करितो की
मला परमेश्वरी इच्छेद्वारें तुमच्याकडे येण्यात यश मिळावे, 11 तेथे येऊन तुम्हांला काही परमेश्वरी कृपादान द्यावे, म्हणजे
त्याद्वारें तुम्ही आत्म्यांत बळकट व्हावे असे मला हवे (इच्छा) आहे, 12 ते असे की आपण एकमेकांच्या विश्वासाने शांति
प्राप्त करावी. 13 मी अनेकदां तुमच्याकडे येण्याची इच्छा बाळगली, परंतु आतापर्यंत अडचण येत राहिली व या
सत्याविषयी तुम्ही अनभिज्ञ (माहित नसलेले) रहावे अशी माझी इच्छा नाही. माझे तुमच्याकडे येण्याचे कारण असे होते
की ज्या प्रकारे गैरयहूदी लोकांमध्ये मला फळ मिळत आहे, त्याच प्रकारे तुमच्यामध्येही काही मिळावे.
14 मी ग्रीक आणि अन्य भाषा बोलणारे, (अन्य देशांतील लोक) ज्ञानी आणि अज्ञानी, या सर्वांचा कर्जदार आहे. 15 तुम्ही
जे रोम शहरांत आहा, तुम्हांला येशूवार्ता सांगण्याची मी अत्यंत उत्सुकतेने वाट पाहातो आहे. 16 मी ख्रिस्तांच्या
वार्तेविषयी शरमिंदा नाहीये, कारण जो कोणी विश्वास करितो त्या प्रत्येकाच्या तारणासाठी आनंदाची ‘येशूवार्ता’
परमेश्वराचे सामर्थ्य आहे, मग तो यहूदी असो किंवा गैरयहूदी. 17 कारण तिच्याठायी परमेश्वराचे नीतिमत्व (खरेपणा)
विश्वासापासून-विश्वासापर्यंत प्रगट होते. जसे लिहिले आहे की, ‘मुक्त झालेला (नीतिमान) मनुष्य विश्वासाने जिवंत
राहील.’
18 जे लोक आपल्या अन्यायाने व दुष्टाईने सत्य दाबून टाकतात (दडवितात), त्यांच्या संपूर्ण दुष्टाईवर आणि
अन्यायावर परमेश्वराचा दंड स्वर्गातून प्रगट होतो. 19 परमेश्वराविषयी जे काही जाणून घेतले जाऊ शकते ते येशूंमध्ये स्पष्ट
व ठळकपणें दिसते व परमेश्वराने त्यांना ते दाखविलेले आहे. 20 कारण या सृष्टीच्या प्रारंभापासून त्यांचे अदृश्य गुण
स्वच्छ व स्पष्ट दिसतात : त्यांचे अनंत सामर्थ्य आणि त्यांचा परमेश्वरी स्वभाव निसर्गात पाहिला जाऊ शकतो, म्हणून
लोक कोणत्याही प्रकारचे कारण पुढे करू शकत नाहीत.
21 कारण परमेश्वराला ओळखल्यानंतरही त्यांनी सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणून त्याचा आदर व सन्मान केला नाही, त्याचे
आभार मानले नाहीत. या विपरित ते व्यर्थ गोष्टींचा विचार करू लागले आणि मूर्खपणाने भरलेले त्यांचे मन अंधाराने
भरून गेले, 22 त्यांनी बुद्धीमान असण्याचा दावा तर केला तरी ते मूर्ख बनले व 23 त्यांनी परमेश्वराला नाशवंत मनुष्य,
पक्षी, चार पायांचे पशु आणि सरपटणारे प्राणी यांच्या समानतेत (प्रतिरूपात) बदलून टाकले.
24 एकमेकांच्या शरीराचा अपमान करावा म्हणून परमेश्वराने, त्यांना त्यांच्या मनाच्या अभिलाषांमुळे होणाऱ्या
अशुद्धतेच्या स्वाधीन करून टाकले. 25 त्यांनी परमेश्वराचा खरेपणा सोडला व त्या जागी लबाडीची निवड केली आणि
परमेश्वराला सन्मान न देता सृष्टीची उपासना केली.

26 यास्तव परमेश्वराने त्यांना लज्जास्पद (किळसवाण्या) तीव्र कामवासनांच्या स्वाधीन केले, कारण स्त्रियां
पुरूषांबरोबर शारीरिक संबंध सोडून, स्त्रियांबरोबर शारीरिक संबंध करू लागल्या. 27 अशाच प्रकारे पुरूषांनी
स्त्रियांबरोबर स्वाभाविक व्यवहार त्यागून, पुरूषांशी यौन संबंधाची कामना केली. पुरूषांनी पुरूषांबरोबर
निर्लज्जपणाचा (अभद्र) व्यवहार केला, आणि त्याचे प्रतिफळ म्हणून जे दुःख त्यांनी सहन करावयाचे होते ते त्यांनी
सोसले.
28 ज्या वेळी त्यांनी आपल्या जीवनात परमेश्वराला स्थान देण्याची इच्छा बाळगली नाही त्या वेळी परमेश्वराने त्यांना
त्यांच्या नीतिभ्रष्ट (घृणित) मनांच्या स्वाधीन केले. 29 सर्व प्रकारची दुष्टाई, लोभमोह, कडवटपणाने ते पुरेपूर भरलेले होते.
ईर्ष्या, हत्या, भांडणतंटे, लुच्चेगिरी आणि शत्रूत्वानेही भरलेले होते, 30 ते वाईट बोलणारे, चहाड्या करणारे, परमेश्वराचा
तिटकारा करणारे, गर्विष्ठ, बढाई मारणारे, वाईट गोष्टी व कल्पनांचे जनक आणि आईवडीलांची आज्ञा न पाळणारे
आहेत; 31 त्याचप्रमाणे बुद्धि नसलेले, शपथा मोडणारे, स्वाभाविक प्रेम रहित, क्षमा रहित (निर्दयी) देखील आहेत,
32 त्यांना ठाऊक आहे की परमेश्वर न्यायी आहे आणि अशी कामें करणारे मृत्यूदंडास पात्र असतातम, तरीही ते स्वतःच
त्या गोष्टी करितात, इतकेच केवळ नाही तर अशी कामें करणाऱ्या लोकांमुळे आनंदीही होतात.

## 2

1 म्हणून हे लोकहो, तुम्ही जे दुसऱ्यांची निर्भत्सना (निंदा) व टिकाटिप्पणी करित असता तुम्ही कोणतेही कारण देऊ
शकत नाही, कारण ज्या मुद्यांविषयी तुम्ही लोकांवर दोष लावता तेच तुम्ही स्वतः करिता. 2 पण आम्हांला हे ठाऊक
आहे की जे लोक अशी कार्यें करितात त्यांच्याविरूद्ध, परमेश्वरी न्याय सत्यानुसार आहे. 3 तुम्ही त्या सर्वांची निंदा करिता
जे अशी कामें करितात, पण स्वतः तसेच (तेच) करिता तेव्हा परमेश्वराच्या न्यायातून (दंडातून) तुमची सुटका होईल
असा तुमचा विचार आहे काय? 4 त्यांची चांगुलपणाची संपत्ति, सहनशीलता आणि धीर व्यर्थ जाणून त्यांचा द्वेष करिता
आणि तुम्हांला समजत नाही काय, की परमेश्वराचा सालसपणा मनाचा पालट (पश्चात्ताप) याविषयी शिकवितो.
5 पण परमेश्वरी क्रोध ओतला जाईल आणि खरा न्याय होईल त्या दिवसाच्या प्रकटीकरणासाठी, तुम्ही आपल्या
कठोर आणि हटवादी मनांमुळे स्वतःकरिता दंड साठवून ठेवित आहा. 6 परमेश्वर प्रत्येकाला त्याच्या कर्मांच्या (कृत्य)
आधारें योग्य ते फळ (मोबदला) देईल. 7 जे लोक धीर बाळगून चांगली कृत्यें करून, सन्मान, महिमा आणि अमरतेची
कामना करितात त्यांना परमेश्वर अनंत जीवन देईल. 8 जे लोक स्वार्थ-शोधक आहेत आणि सत्य मानत नाहीत
(स्वीकारीत), परंतु वाईट जीवनाचे पालन करण्याची ज्यांना सवय झालेली आहे त्यांना परमेश्वराचा प्रकोप आणि दंड
मिळेल. 9 प्रत्येकावर जो दुष्टाई करितो त्याच्या जिवावर, क्लेश व संकटे येतील, प्रथम यहूदी आणि नंतर गैरयहूदी
मनुष्यावर. 10 पण उत्तम जीवन जगणाऱ्यांकरिता प्रशंसा, आदर आणि शांतीही उपलब्ध आहे: प्रथम यहूदी आणि नंतर
गैरयहूदी. 11 कारण परमेश्वर कोणाचाही पक्ष घेत नाही.
12 जितक्यांनी नियमशास्त्राविना अपराध केले आहेत, त्यांचा न्याय नियमशास्त्राव्यतिरिक्त होऊन ते नाश पावतील,
परंतु जितक्यांनी नियमशास्त्र असूनही अपराध केले आहेत त्यांचा न्याय नियमशास्त्रानुसारच केला जाईल. 13 कारण
नियमशास्त्र ऐकणारे नीतिमान व सिद्ध ठरविले जाणार नाहीत, पण जे नियमांनुसार जीवन जगतात, तेच नीतिमान व सिद्ध
असे घोषित केले जातील. 14 कारण ज्या वेळी गैरयहूदी लोकांकडे नियमशास्त्र नसते व जेव्हा स्वाभाविक रीतिने ते
नियमशास्त्रानुसार आचरण करितात, तेव्हा जरी त्यांच्या हातांत नियमशास्त्र उपलब्ध नसले तरीही, ते आपल्या मनांतच
नियमांचे पालन करितात. 15 ते नियमशास्त्रातील आचारविचार त्यांच्या हृदयांत लिहिल्यासारखे वागतात आणि त्यांचा
विवेकही याविषयीची साक्ष देतो. कधी कधी त्यांचे विचार दोष लावतात किंवा त्यांना निर्दोषी ठरवितात. 16 जेव्हा
परमेश्वर माझ्या संदेशाच्या आधारे, लोकांच्या गुप्त गोष्टींचा न्याय येशू ख्रिस्तांद्वारे करील, त्या दिवशी हे सर्व घडेल.
17 तू स्वतःला यहूदी म्हणवितोस, तुझा विश्वास नियमशास्त्रावर आहे व तू तुझ्या परमेश्वराबरोबरच्या संबंधांविषयी
गर्व बाळगतोस 18 आणि त्याची इच्छा जाणतोस, सर्वोत्तम गोष्टीं योग्य म्हणून मान्य करितोस, कारण तुला त्या गोष्टी

नियमशास्त्रातून शिकविलेल्या आहेत; [19] तुला या गोष्टीचा विश्वास आहे की तू स्वतः आंधळयांना मार्ग दाखवू शकणारा,
आणि जे अंधारांत आहेत त्यांच्याकरिता प्रकाश म्हणून जगणारा आहेस. [20] तू मूर्खांना शिकविणारा व लहान बाळकांना
शिक्षण देणारा आहेस, कारण तुझ्याजवळ नियमशास्त्रातील ज्ञान आणि सत्याविषयीचे आवश्यक तत्व आहे; [21] तर मग
तू जो दुसऱ्यांना शिकवितोस ते सर्व स्वतःलाच शिकवीत नाहीस काय? दुसऱ्यांना शिकवितोस की चोरी करू नका,
पण स्वतःच चोरी करितोस? [22] दुसऱ्यांना सांगतोस की व्यभिचार करू नये, पण स्वतःच तसे करितोस? मूर्तीचा
तिटकारा करितोस पण मंदिर स्वतः च लुटून टाकत नाहीस काय? [23] तू स्वतः नियमशास्त्राविषयी अभिमान बाळगतोस,
पण त्याचे पालन न करता तू परमेश्वराचा अनादर व अपमान करीत नाहीस काय? [24] जसे लिहिले आहे, की ‘गैरयहूदी
लोकांमध्ये तुमच्यामुळे परमेश्वराच्या नांवाची निंदा होत आहे.’
[25] जर तू नियमशास्त्राचे पालन करणारा असलास तर सुंतेचा कांही फायदा आहे, पण नियमशास्त्राच्या गोष्टी मोडून
त्यांचे उल्लंघन करीत असलास, तर सुंता झालेली असूनही तू नसलेल्यासारखाच होऊन जातोस. [26] जर एखाद्याची सुंता
झालेली नसूनही, तो नियमशास्त्रातील धार्मिकतेचे (नियम) पालन करीत असेल, तर सुंता झालेली नसूनही तो सुंता
झालेला म्हणविला जाणार नाही काय? [27] एखाद्या मनुष्याची शारीरिक सुंता झालेली नसेल आणि तरी तो नियमशास्त्राचे
आचरण करून जीवन जगत असेल, व तुम्ही लेखी नियमशास्त्र प्राप्त करून आणि सुंता करूनही जर परमेश्वरी आज्ञांचे
पालन करीत नाही, तर अशा परिस्थितीत (प्रसंगी) तुम्हीच सांगा तो तुम्हांला आरोपी ठरविणार नाही काय?
[28] जो मनुष्य फक्त यहूदी आईवडीलांद्वारे जन्मतो तो यहूदी नव्हे, आणि ती सुंता देखील कांही महत्वाची व अर्थाची
नाही कारण ती केवळ दाखविण्यासाठीची असते; [29] जो आंतरिक (आंतून) दृष्टया यहूदी आहे, तोच खरा यहूदी कारण
अंतःकरणाची सुंता तीच होय, जी परमेश्वराच्या आत्म्याद्वारे (आत्म्यापासून) केली जाते, लिहिलेल्या नियमांच्या
पालनाद्वारे नव्हे, अशा प्रकारच्या मनुष्याची प्रशंसा लोकांपासून नाही तर परमेश्वराकडून होत असते.

# 3

[1] एक यहूदी असण्याचा काय लाभ किंवा सुंता झालेल्याचा काय फायदा? [2] अनेक (विपुल) फायदे आहेत, कारण
परमेश्वराची वचनें त्यांच्याकडेच (सोपविलेली) होती.
[3] जरी काही लोकांनी विश्वास केला नाही तरी काय झाले? अशा अविश्वासी लोकांचा अविश्वास, परमेश्वराची
विश्वासयोग्यता प्रभावहीन (छाप) किंवा परिणामहीन करू शकते काय? [4] नाहीच मुळी, कधीही नाही! परमेश्वर खरा
आणि प्रत्येक मनुष्य खोटा ठरो. जसे लिहिले आहे की, ‘तू आपल्या बोललेल्या वचनांत (शब्दांत) खरा ठरविला
जावास, तुझ्या शब्दांचे समर्थन व्हावे आणि जेव्हा न्याय होईल, तेव्हा तू त्यांवर मात करून तुला जय मिळावा.’
[5] जर आपली अनीति (वाईट व चुकीची जीवनशैली) परमेश्वराची विश्वासपात्रता दर्शविते तेव्हा मग आपण काय
म्हणावे? असे म्हणावे काय, की मनुष्यावर दंड आणिल्यामुळे परमेश्वर अन्यायी आहे (मी मनुष्य होण्याच्या नात्याने असे
बोलतो)? [6] नाहीच मुळी, कारण त्या स्थितीत परमेश्वर लोकांचा न्याय कसा करील? [7] माझ्या खोटया लबाडीने जर
परमेश्वराचे सत्य त्याचे गौरव विपुल करीत असेल, तर मी परमेश्वराच्या दृष्टीत दोषी का ठरावें? [8] याऐवजी आपण असे
का म्हणू नये की (जसे की आमच्यावर असा आरोप ठेवला जातो की आम्ही असे मानतो) - “चला आपण दुष्टाई करावी
म्हणजे त्यांतून बरे निर्माण व्हावे”? अशा लोकानचे दोषी ठरविले जाणे न्याय्य व योग्यच आहे.
[9] मग काय म्हटले जावे? आपण त्यांच्याहून श्रेष्ठ व उत्तम आहोत काय? नाही, मुळीच नाही, कारण आम्ही आधीच
असा आरोप ठेवला आहे, की दोन्ही (यहूदी व गैरयहूदी), परमेश्वराच्या दृष्टीने अपराधी आहेत. [10] जसे लिहिले आहे
की, 'कोणताही मनुष्य नीतिमान (निर्दोष) आणि खरा नाही, एक देखील नाही, [11] असा एकही मनुष्य नाही, ज्याला समज
असावी किंवा ज्याला परमेश्वराकरिताची भूक लागलेली असावी; [12] ते सर्व मार्गावरून भटकले आहेत आणि बेकार,
कुचकामी आणि टाकाऊ झाले आहेत, असा कोणी नाही ज्याने कोमलता दाखववावी, एक देखील नाही. [13] त्यांचा घसा
जशी उघडी कबर आहे कारण ते आपल्या जिभेने खोटे बोलतात, त्यांच्या ओठांखाली सापाचें विष आहे; [14] त्यांचे तोंड

शापाने आणि कडवटपणाने भरलेले आहे. 15 त्यांचे पाय रक्त सांडण्यासाठी उतावीळ आहेत. 16 त्यांच्या मार्गात दुर्दशा,
क्लेश, विनाश आणि दुःख आहे. 17 त्यांना सुखचैन व शांतीचे मार्ग ठाऊक नाहीत. 18 त्यांच्या डोळयांसमक्ष परमेश्वराचे
भय नाही'.
19 आता आपल्याला ठाऊक आहे की जे काही नियमशास्त्र सांगते, ते त्यांनाच उद्देशून सांगते जे नियमशास्त्राच्या
आधीन असून त्यांचे पालन करितात व ते मान्य करितात, यासाठीच की प्रत्येक तोंड बंद केले जावे आणि
परमेश्वरासमोर सबंध जगाने जवाबदार (दोषी) ठरावे. 20 म्हणून केवळ नियमशास्त्राच्या पालनाने कोणताही मनुष्य
परमेश्वराच्या दृष्टीत नीतिमान (सिद्ध) ठरविला जाणार नाही, कारण नियमशास्त्राद्वारेच कळते की काय वाईट आहे आणि
काय नाही.
21 आता परमेश्वराने आपल्याला एक मार्ग (पद्धत) दाखविलेला आहे, की मोशे आणि संदेष्टयांच्या पुस्तकांत ज्या
नियमांचे पालन करण्याची प्रतिज्ञा आहे, त्या व्यतिरिक्त कशा प्रकारे परमेश्वराबरोबर संबंध कायम केला जाऊ शकतो.
22 येशू ख्रिस्तांवर विश्वास ठेवल्याने परमेश्वराकडून मिळणारे नीतिमत्व (पवित्रता व सिद्धता), सर्व विश्वास
करणाऱ्यांसाठीचे आहे, मग ते कोणीही असोत. 23 सर्व जण आपल्या जीवनांत चुकलेले (कमी पडले) आहेत आणि
परमेश्वरासमोर खरे नाहीत. 24 परंतु जी सुटका आणि वाईटापासून वाचविले जाणे येशूं ख्रिस्तांठायी, त्यांच्या महान
कृपेमुळे आहे त्याद्वारे ते मोफत (विनामूल्य) सिद्ध केले गेलेले आहेत. 25 अनुग्रहाच्या (दयेच्या) स्थानावर ज्या विश्वासाने
पोहचले जाते, त्याठिकाणी परमेश्वराने त्यांच्या मृत्यू समयी येशूंना सर्वांपुढे ठेवले, 26 परमेश्वराने असे यास्तव केले की
या समयी, त्याची विश्वासयोग्यता प्रगट व्हावी आणि येशूंवर विश्वास ठेवणाऱ्याला त्याने नीतिमान (सिद्ध झालेला)
ठरवावे.
27 तर मग, गर्व करणे कोठे राहिले? त्याची तर कोणती जागाच राहिली नाही आणि जर आहे तर मग ती कोणत्या
सिद्धातांने आहे? कर्मांच्या (काम) सिद्धांताने नव्हे? परंतु विश्वासाच्या सिद्धांताने. 28 यावरून आपण असे मत किंवा
निष्कर्ष काढू शकतो की (नियमशास्त्राच्या कर्मापासून वेगळे म्हणजे), केवळ विश्वासानेच एक मनुष्य धार्मिक (सिद्ध)
घोषित केला जातो. 29 परमेश्वर केवळ यहूद्यांचाच आहे काय? तो गैरयहूद्यांचा देखील नाही काय? होय, परमेश्वर, यहूदी
आणि गैरयहूदी लोकांचाही परमेश्वर आहे. 30 म्हणून जर सुंता झालेल्या आणि सुंता न झालेल्यांना, एकमेव परमेश्वर
विश्वासाद्वारे क्षमा करितो, 31 तर विश्वासाच्या महत्वामुळे आपण नियमशास्त्राला निरोप द्यावयाचा काय? नाहीच मुळी!
या विपरित आपण, नियमशास्त्राला आवश्यक असलेला, योग्य व समर्पक आदर-सन्मान देतो.

## 4

1 अब्राहाम, जो शारीरिकदृष्टया आपला पूर्वज आहे, विश्वासाने मुक्तीच्या प्रश्नांवर कोणत्या प्रकारचा अनुभव ठेवी?
2 जर अब्राहाम कर्मांद्वारे सिद्ध ठरविला गेला, तर त्याने अभिमान बाळगणे यथायोग्य आहे परंतु तरीही परमेश्वरासमोर
नाही. 3 याविषयी बायबलमध्ये काय लिहिलेले आहे? अब्राहामाने विश्वास ठेवला आणि ‘त्या प्रकारचा विश्वास करणे’
त्याच्याकरिता विश्वासयोग्यता म्हणून गणिली गेली.
4 जो परिश्रम करितो, त्याची मजुरी बक्षिस नव्हे तर तो त्याचा हक्क आहे. 5 पण जो मेहनत करीत नाही (पण परमेश्वर जो
दुष्टाला पवित्र ठरवितो) आणि त्याच्यावर विश्वास ठेवितो, त्या मनुष्याचा विश्वास त्याच्याकरिता विश्वासयोग्यता गणिला
जातो. 6 अगदी जसे दावीद राजा देखील म्हणतो, "जो कर्मांच्या आधारे नव्हे तर विश्वासाच्या आधारे नीतिमान ठरविला
जातो, तो मनुष्य धन्य व आशीर्वादित आहे". 7 “आशीर्वादित ते आहेत ज्यांचे अपराध क्षमा केले गेलेत आणि ज्यांची
दुष्टाई झाकून टाकली गेली. 8 आशीर्वादित मनुष्य तो आहे,ज्याचावर आरोप ठेविला गेलेला नाही.
9 केवळ सुंता झालेलेच आशीर्वाद प्राप्त करितात काय किंवा मग सुंता न झालेल्यांनाही आशीर्वाद मिळतो? कारण
आम्ही असे म्हणतो की, “अब्राहाम विश्वासाने नीतिमान ठरविला गेला.” 10 अब्राहाम केव्हा नीतिमान ठरविला गेला
होता, सुंता होण्यापूर्वी किंवा सुंता झाल्यानंतर? नाही सुंतेच्या नंतर नाही परंतु त्या आधीच, 11 म्हणजे ज्या वेळी तो

‘सुंता न झालेला होता.’ जेव्हा त्याने सुंतेची खूण प्राप्त केली, तेव्हा त्याच्यासाठी विश्वासाने नीतिमत्व मिळविण्याचा तो
शिक्का होता व असे यास्तव झाले की लोकांना नीतिमत्व मिळावे; तसेच असे देखील की विश्वासाद्वारे अब्राहामाने अशा
लोकांचा बाप व्हावे, जे सुंता न झालेल्या दशेत असताना विश्वास ठेवितात व तेही नीतिमान गणिले जावेत. [12] अब्राहाम
केवळ सुंता झालेल्यांचाच बाप नव्हे, पण त्यांच्याही आहे जे अब्राहामाच्या पदचिन्हांवर चालतात, कारण त्याच्याजवळ
सुंता न झालेल्या दशेतही विश्वास होता.
[13] मोशेच्या नियमशास्त्राद्वारे अब्राहाम किंवा त्याच्या वंशापर्यंत जगाची विरासत प्राप्त करण्याची प्रतिज्ञा पोहचली
नव्हती, परंतु तो वारसा-हक्क विश्वासामुळे मिळणाऱ्या नीतिमत्वाद्वारे त्याच्यापर्यंत पोचला होता. [14] जर लोक
नियमशास्त्रामुळे वारीस होत असतील, तर विश्वास व्यर्थ ठरला आणि प्रतिज्ञा देखील प्रभावहीन झाली. [15] कारण
नियमशास्त्राचे पालन न केले गेल्याने प्रकोप उत्पन्न होतो, पण जेथे नियमशास्त्र नाहीच नाही, ते मोडण्याचा प्रश्नच
उद्‌भवत नाही.
[16] म्हणूनच प्रतिज्ञा (हमी) विश्वासाचा परिणाम (निष्पत्ती) आहे आणि ती हमी विश्वासावर अवलंबूनही आहे, यासाठी
की अब्राहामाच्या वंशासाठीची प्रतिज्ञा निश्चितरूपाने कार्यशील व्हावी, केवळ त्यांच्याकरिताच नाही जे नियमशास्त्राचे
पालन करितात, परंतु त्यांच्याकरिताही जे अब्राहामासारखा विश्वास बाळगतात आणि जो आपल्या सर्वांचा बाप आहे.
[17] जसे लिहिले आहे की, ‘मी तुला बहुत राष्ट्रांचा बाप केले आहे’, व परमेश्वरावर त्याने (अब्राहाम) विश्वास ठेवला,
त्याच्या (परमेश्वर) उपस्थितीत अब्राहाम आपला बाप आहे - हाच तो परमेश्वर जो मेलेल्यांना जिवंत करितो, व ज्या
गोष्टी नाहीत (अस्तित्व) त्यांना अशा प्रकारे म्हणतो, जशा काय त्या वास्तविक स्वरूपात आहेतच.
[18] कोणतीही आशा नसताना अब्राहामाने विश्वास ठेवला, तो असा की जे काही त्याला सांगितले गेले होते, “की तुझा
वंश असा होईल किंवा तुझे संतान ताऱ्यांसारखे असंख्य होतील,” याच कथनानुसार तो बहुत देशांचा बाप झाला.
[19] अब्राहाम विश्वासात अजिबात डळमळला नव्हता, लटपटला नव्हता. शंभर वर्षांचा असल्यावरही त्याने स्वतःचे शरीर
आणि सारेचा गर्भाशय मेलेले जाणले नाही. [20] शंकेमुळे तो परमेश्वराच्या अभिवचनांसंदर्भाने डळमळीत झाला नाही, परंतु
परमेश्वराची स्तुति करीत तो विश्वासात भक्कम असा राहिला आणि त्याने परमेश्वराचा महिमा केला. [21] अब्राहाम पूर्णपणे
निश्चिंत आणि आश्वस्त होता की जसे अभिवचन त्याला मिळालेले आहे, तसे करावयास परमेश्वर समर्थ आहे. [22] म्हणून
त्याचा हा विश्वास त्याच्या नांवावर 'विश्वासयोग्यता' म्हणून गणिला गेला, [23] म्हणूनच हे केवळ अब्राहामासाठी लिहिले
गेले नव्हते परंतु आपल्यासाठीही लिहिलेले होते. [24] जर आपण त्या परमेश्वरावर विश्वास ठेवला, ज्याने येशूंना
मेलेल्यांतून जिवंत उठविले, [25] आणि विश्वास देखील केला की आमच्या अपराधांमुळे येशू मारले गेले, आणि आम्हांला
सिद्ध (नीतिमान) ठरविण्याकरिता ते जिवंत उठविले गेले.

# 5

[1] म्हणून जर आम्ही विश्वासाने नीतिमान (दोषमुक्त, क्षमा केलेले आणि सिद्ध) ठरविले गेलो, तर प्रभू येशू ख्रिस्तांद्वारे
परमेश्वराबरोबर आपले योग्य नाते आहे. [2] विश्वासाद्वारे आपल्याला संधी मिळते व त्या अटहीन कृपेपर्यंत प्रवेश
(अनुग्रह) मिळतो, ज्यांत आम्ही आजवर स्थिर व कायम आहोत आणि परमेश्वराच्या गौरवाच्या आशेने आम्ही आनंदित
देखील होतो. [3] इतकेच केवळ नव्हे, तर आम्ही आपल्या संकटांत व छळांतही आनंदी होतो, ही जाणीव ठेवून की
संकट (छळ) सहन करीत राहिल्याने धीर निर्माण होतो. [4] धीरपूर्ण सहनशीलता चरित्र घडविते आणि ग्रहणयोग्य
चारित्र्याने आशा निर्माण होते. [5] आशा कोणत्याही प्रकारे निराश करीत नाही, कारण जो पवित्र आत्मा आपल्याला
दिलेला आहे, त्याच्याद्वारे परमेश्वर पित्याचे प्रेम त्याने आपल्या अंतःकरणात ओतले आहे.
[6] ज्या वेळी आपण आपल्या कमजोर (असहाय्य) अवस्थेत होतो, [7] त्या वेळी परमेश्वर रहित लोकांसाठी येशू मरण
पावले (फार क्वचितच, कदाचित कोणी, एखाद्या उत्तम मनुष्याकरिता आपला प्राण देण्याचे धाडस करील). [8] परंतु
परमेश्वर आपले प्रेम अशा प्रकारे दर्शवितो : की ज्या वेळी आपण दोषीच (अपराधी) होतो, येशू ख्रिस्त आपल्यासाठी

मरण पावले.
9 यापेक्षा अधिक ही गोष्ट आहे की जर त्यांच्या रक्ताने आपण नीतिमान ठरविले गेलो, तर मग आपण येशूंद्वारे
परमेश्वराच्या दंडाने का बरे वाचणार नाही? 10 कारण जर आपण परमेश्वराचे वैरी होतो, तर त्याच्या पुत्राच्या मृत्यूमुळे
आपला त्याच्याशी मेळ झाला आहे, तर मग आता त्यांच्या जीवनाने आपण उद्धार का प्राप्त करणार नाही? 11 इतकेच
केवळ नव्हे, तर आपण ख्रिस्त येशूंद्वारे परमेश्वराठायी देखील आनंदित होतो,ज्यांच्याद्वारें आपण हे नाते प्राप्त केलेले
आहे.
12 म्हणून एका मनुष्याद्वारे अपराध जगात शिरले आणि अपराधाद्वारे मरण, म्हणून सर्वांनी अपराध केल्यामुळे मरण
सर्व लोकांत पसरले. 13 नियमशास्त्र दिले जाईपर्यंत अपराध जगात होते, परंतु जेथे नियमशास्त्र नाहीये तेथे अपराध
असण्याची गोष्टच नाहीये. 14 तरीही मरणाने आदामापासून मोशेपर्यंत राज्य (शासन) केले, अर्थात त्यां लोकांवरही ज्यांनी
‘आदामाच्या आज्ञाभंगासारखा’ अपराध केलेला नव्हता, आदाम ‘येणाऱ्याचाच’ एक नमूना आहे.
15 परंतु तरीही मोफत मिळणाऱ्या बक्षिसाची तुलना अपराधांशी केली जाऊ शकत नाही. कारण जर एका मनुष्याच्या
अपराधांमुळे बहुत माणसें मेली तसेच एकाच मनुष्याच्या (येशू ख्रिस्त) कृपेद्वारे परमेश्वराच्या कृपेचे बक्षिस पुष्कळ
लोकांकरिता विपुल असे आहे. 16 या कृपेची (बक्षिस) तुलना अपराधाच्या त्या परिणामाशी केली जाऊ शकत नाही, जो
प्रथम मनुष्य आदाम याच्या आज्ञा मोडल्याने झाला होता. कारण एका मनुष्याद्वारे न्याय आला आणि त्यामुळे लोक दोषी
ठरले, परंतु जी मोफत सिद्धता (नीतिमत्व) संपूर्ण अपराधांनंतर आली, ती ‘सिद्धता’ आपण निर्दोषी (नीतिमत्व) ठरावे
यासाठीची होती. 17 एका मनुष्याच्या अपराधामुळे मरणाने राज्य केले, तर एका निर्दोषी मनुष्याच्या मरणाने आणखी
किती अधिक लोक कृपेची विपुलता आणि नीतिमत्व (सिद्धता) याचे बक्षिस मिळवतील, म्हणून असे लोक आपल्या
जीवनात त्याच येशू ख्रिस्तांद्वारे राज्य करितील.
18 म्हणूनच ज्या प्रकारे एका मनुष्याच्या अपराधांमुळे सर्व लोकांवर दंड आला आणि सर्वचे सर्व दोषी ठरले, त्या
प्रकारेच एका मनुष्याच्या समर्पक पावलांनी (निर्णय), सबंध मानवजातीचे जीवनदायी समर्थन, अर्थात ‘मोफत नीतिमान
ठरविले जाणे’ झाले. 19 आता, ज्याप्रमाणे एकाच मनुष्याच्या आज्ञा उल्लंघनामुळे बहुत लोक अपराधी ठरले, त्याचप्रमाणे
एका मनुष्याच्या आज्ञापालनामुळे विपुल लोक नीतिमान (सिद्ध) ठरविले जातील.
20 या व्यतिरिक्त नियमशास्त्र याकरिता आले की अपराध वाढत जावा, परंतु जरी अपराध वाढत गेले तरी कृपा
त्यांहून आणखी अधिक वाढत गेली, 21 यासाठी की जसे अपराधाने मरणाद्वारे शासन केले तसे कृपेने सुद्धा, प्रभू येशू
ख्रिस्तांद्वारे अनंत जीवनात राज्य करावे.

# 6

1 तर मग आता आपण काय म्हणावे? विपुल प्रमाणात अटहीन कृपा प्राप्त करीत जावी यासाठी आपण दुष्टाईत
(अपराध) कायम रहावे काय? 2 नाहीच मुळी. हे कसे शक्य आहे की जर आपण एकदा दुष्टाईकरिता (अपराध) मेलो
असलो, तर मग पुन्हा दुष्टाईयुक्त जीवन जगावे? 3 तुम्हांला ठाऊक नाही काय, की आपल्या जितक्यांचा येशू ख्रिस्तांच्या
नांवाने बाप्तिस्मा केला गेला तो येशूंच्या मरणाचा बाप्तिस्मा होता, 4 म्हणून आपण या बाप्तिस्म्याने येशूंबरोबर पुरले गेलो,
याकरिता, की ज्या प्रकारे परमेश्वरी सामर्थ्याने येशू ख्रिस्त जिवंत केले गेले, त्याच प्रकारे जीवनाच्या नाविन्यपूर्ण शैलीने
आपण जगू शकण्यास समर्थ व्हावे.
5 कारण जर आपण येशूंच्या मरणाच्या समानतेत संयुक्त झालो आहोत, तर आपण त्यांच्या जिवंत उठण्याच्या
समानतेतही जोडले जाऊ. 6 आम्हांला ठाऊक आहे की आमचे जुने मनुष्यत्व (जुने अपराधी जीवन) येशूंबरोबर क्रूसावर
खिळले गेले होते, यासाठी की गुन्हें (अपराध) असलेले शरीर व्यर्थ (वंचित) व्हावे आणि आता आपण अपराधांची
सेवा करू नये. 7 कारण जो मनुष्य ख्रिस्तांबरोबर मेलेला असतो, तो अपराधांपासून (गुन्हा) मुक्त केला गेलेला आहे.
8 आता जर आपण ख्रिस्तांबरोबर मेलेले आहोत, तर आपला विश्वास आहे की आपण ख्रिस्तांबरोबर जिवंतही राहू.

9 जे मेलेल्यांतून जिवंत उठविले गेले ते ख्रिस्त पुन्हा मरण पावणारच नाहीत, ही जाणीव आपण बाळगवी. आता
त्यांच्यावर मरणाचा अधिकार (सत्ता) राहिलेला नाही, 10 कारण ज्या प्रकारचे मरण त्यांनी सोसले, ते मरण
सर्वांच्यासाठीचे अनंत काळाचे मरण होते, म्हणून जे असे जीवन जगतात ते परमेश्वरासाठीच जगतात.
11 अशाच प्रकारे तुम्हीही आपल्या स्वतःला अपराधांसाठी मेलेले, परंतु आपले स्वामी येशू ख्रिस्त यांच्याद्वारे
परमेश्वराकरिता जिवंत असे माना (समजा). 12 मर्त्य शरीराची हाव (तीव्र अभिलाषा) पूर्ण व्हावी म्हणून (नाशवंत)
अपराधाला तुम्ही अधिकार देऊ नका, वा 13 आपल्या शरीरांचे अवयवा अनीतीची हत्यारें होण्याकरिता अपराधांच्या
दास्यत्वाला सोपू नका या विपरित मेलेल्यांतून जिवंत उठलेल्यांसारखे, परमेश्वराकडे स्वतःच्या शरीरांचे अवयव,
समर्पक वागणूकीची हत्यारें होण्यासाठी सोपवून द्या. 14 अपराधाने तुमच्यावर सत्ता गाजवू नये, कारण तुम्ही आता
नियमशास्त्राच्या आधीन नसून अटहीन असीमित कृपेच्या (अनुग्रह) आधीन आहा.
15 तर मग आता काय? कारण जेव्हा आपण नियमशास्त्राच्या आधीन नाही आणि अपरिमित (अमर्याद) कृपेच्या
आधीन आहोत, म्हणून अपराध करीतच राहू काय? मुळीच नाही. 16 तुम्हांला हे ठाऊक नाही काय, की तुम्ही गुलाम
म्हणून ज्याची आज्ञा पाळण्याकरिता स्वतःचे समर्पण करिता फक्त त्याचेच गुलाम आहा. एकतर अपराधांचे (गुन्हा)
गुलाम जे मरणापर्यंत घेऊन जाते, किंवा आज्ञापालनाचे गुलाम जे नीतिमत्वाकडे (खरे जीवन) घेऊन जाते. 17 परमेश्वराचे
आभार असोत की अपराधांचे व गुन्ह्यांचे गुलाम असतानाही, जी शिकवण तुम्हांला दिली गेली होती ती तुम्ही तुमच्या
अंतःकरणापासून मानली (स्वीकारली). 18 यास्तवच केवळ अनुग्रहाने स्वतंत्र केले गेल्यानंतर, तुम्ही विश्वासयोग्यतेचे
गुलाम झाला आहा.
19 गुलाम (दास) आणि त्यांना ठेवणारे जे लोक असतात, त्यांचे उदाहरण देऊन मी म्हणतो, “की त्यांच्या अशा
प्रकारच्या उदाहरणावरून समजून घेणे सोपे आहे. पहा, पूर्वी तुम्ही अशुद्धता आणि बेकायदेशीर (अवैध) व्यवहारांचे
गुलाम होता, म्हणून आता मात्र कायदेशीर, सात्विक व खऱ्या जीवनाचे गुलाम होण्याची निवड तुम्ही करायलाच हवी
आहे, जेणेकरून व्यवहारांत पवित्र होऊन जावे; 20 कारण ज्या वेळी तुम्ही अपराधांचे गुलाम होता, त्या वेळी तुम्हांला
या गोष्टीची चिंता (पर्वा) नव्हती की जे काही उचित व यथायोग्य आहे तेच केले जावे. 21 ज्या गोष्टींची तुम्हांला आता
लाज वाटते आहे, जुन्या समयी तुम्हांला त्या गोष्टींपासून काय फायदा होत होता? कारण त्या सर्व गोष्टींचा अंत मरण
आहे, 22 परंतु आता तुम्ही अपराध मुक्त होऊन, परमेश्वराचे गुलाम झाला आहा. आता तुम्ही ते सर्व काही करू शकता
ज्यांद्वारे पवित्रता मिळते आणि ज्याचा परिणाम आहे - अनंत (सार्वकालिक) जीवन किंवा परमेश्वरी जीवन.
23 कारण अपराधाची (गुन्हा) मजूरी मरण आहे परंतु आपले स्वामी येशू ख्रिस्त, यांच्याठायी परमेश्वराचे बक्षिस अनंत
जीवन (जे कधीही संपणार नाही असे परमेश्वरी जीवन) आहे.

# 7

1 हे भावांनोबहिणींनो, तुम्हांला ठाऊक नाही काय की मी अशा लोकांना लिहीत आहे ज्यांना परमेश्वराने दिलेल्या
नियमांचे ज्ञान आहे, अर्थात हेच की या पृथ्वीवरील संपूर्ण जीवनाच्या काळांत, एक मनुष्य त्याच नियमांचे पालन
करण्यासाठी कायदेशीररित्या बांधलेला आहे? 2 उदाहरणार्थ, जोपर्यंत पति जिवंत आहे तोपर्यंत कायदयान्वये एक
विवाहीत स्त्री पतिशी बांधलेली आहे, पण जेव्हा तिचा पति मरण पावतो तेव्हा ती विवाह कायद्याच्या बंधनांतून स्वतंत्र
होऊन जाते; 3 म्हणून जर, तिच्या पतिच्या जिवंतपणी ती एखाद्या दुसऱ्या पुरूषाशी विवाह करिते, तर तिला वेश्या
(व्यभिचारिणी) म्हटले जाईल. परंतु जर तिचा पति मेला , तर पतिबरोबर असलेले तिचे वैवाहिक बंधन तुटून जाते
आणि जर त्यानंतर ती दुसऱ्या पुरूषाशी विवाह करीत असेल तर मग ती वेश्या असणार नाही.
4 म्हणून माझ्या भाऊबहिणींनो, तुम्ही ख्रिस्तांच्या शरीराद्वारे नियमशास्त्रासाठी (मोशेद्वारे परमेश्वराने दिलेले नियम)
मेलेले असे आहा, यासाठी की तुम्ही मेलेल्यांतून जिवंत केले जाऊन ख्रिस्तांचे व्हावे आणि परमेश्वराकरिता फळें
(पवित्रता) आणावीत. 5 जेव्हा आपण वाईट स्वभावाच्या (जुना स्वभाव) नियंत्रणात होतो, नियमांच्या आधीनतेमुळे,

चेतना देणाऱ्या विषय वासनेच्या भावनेवेगांन्वये, वाईट अभिलाषा आपल्या शरीरांत कार्य करीत होती, ज्याद्वारें आपण
मृत्यूकरिता (शारीरिक आणि अनंत) परिणाम उत्पन्न करीत होतो. 6 ज्या गोष्टीने आपल्याला आपल्या नियंत्रणात ठेवले
होते, आता त्याकरिता मरण पावल्याने आपण नियमांच्या आधीनतेतून सोडविले (मुक्त) गेले आहोत, जेणेकरून आपण
पवित्र आत्म्याच्या नव्या पद्धतीने (रीतिने) सेवा करावी आणि रीतीविधी व बलिदानांनी नव्हे.

7 तर मग आपण काय म्हणावे? नियमशास्त्र वाईट आहे? नाही! कारण नियमशास्त्राशिवाय काय वाईट आहे, ते मी
सुद्धा जाणू शकलो नसतो : उदाहरणार्थ, जर परमेश्वराने अशी पुनरावृत्ति केली नसती, की ‘तुम्ही लोभ धरू नका’, तर
लोभ काय आहे हे मला समजता आले नसते. 8 आज्ञा दिली गेल्यामुळे, माझ्या आत गुन्ह्याने (अपराध) संधी साधली
आणि माझ्याठायी सर्व प्रकारचा लोभ निर्माण केला. 9 एक समय होता जेव्हा मी नियमआज्ञा यांच्याकडे दुर्लक्ष करून
जीवन जगत होतो, पण जेव्हा त्यांचा नीट नीट विचार केला तेव्हा मला या गोष्टीची खात्री झाली, की परमेश्वरी
जीवनासाठी अजूनही मी मेलेल्या दशेतच आहे, 10 ज्या आज्ञेपासून जीवन घेऊन येण्याची अपेक्षा होती ती मरण घेऊन
आली. 11 कारण वाईटाने (अपराध) आज्ञेच्या साहाय्याचा फायदा घेतला, मला धोका दिला आणि आज्ञेने मला आत्मिक
रीतिने मारून टाकले. 12 म्हणूनच परमेश्वरी आज्ञा उत्तम आणि खरी आहे.

13 जे सर्वोत्तम आणि सर्वोत्कृष्ट आहे, ते माझ्यासाठी मरण असू शकते काय? अजिबात नाहीच! पण याकरिता की
अपराध वाईटच दिसावे, जे काही उत्तम होते त्याने माझ्याठायी मरण घडवून आणले, जेणेकरून आज्ञेद्वारे अपराधाने
मर्यादा ओलांडून खूप जास्तच वाईट दिसावे.

14 आपल्याला ठाऊक आहे की नियमशास्त्र आत्मिक आहे, पण मी आत्मिक नाहीये आणि अपराधांच्या हाती गुलाम
रूपात विकलेला असा आहे. 15 मला कळत नाही की मी काय करितो, कारण जे काही करावयाचे (इच्छा) आहे ते करू
शकत नाही, परंतु ज्याचा मला द्वेष वाटतो तेच करितो. 16 जर मी तेच करितो जे करण्याची मला इच्छा नसते, तर मी
असे मान्य करितो की मोशेद्वारे दिलेले नियम व आज्ञा उत्तम आहेत. 17 अशा स्थितीत करणारा मी नव्हे, परंतु
माझ्याठायी वसलेले अपराध (वाईट, जुना स्वभाव) आहे. 18 मला ठाऊक आहे की माझ्यात अर्थात माझ्या शरीरात
काहीही चांगले नाहीये. जे चांगले काम करण्याची माझी इच्छा असते, ते मी करू शकत (साधले जात) नाही, जे वाईट
मी करू इच्छित नाही तेच करीत राहतो. 19 जर मी तेच करतो ज्याची मला इच्छा नाही तर ते करणारा मी नव्हे, 20 परंतु
माझ्याठायी वसलेला माझा वाईट स्वभाव आहे.

21 मला ही प्रवृत्ति (गतिविधि) माझ्या आत आढळते, की ज्या वेळी मी 'चांगली' कृत्यें करण्याची इच्छा बाळगतो, त्या
वेळी मला घट्टपणे आवळून टाकण्यास 'वाईट' तयार असते. 22 मी आंतरिकदृष्टया (अंतःकरणात) परमेश्वराच्या गोष्टींमुळे
(नियम) आनंदी रहातो, 23 पण माझ्या शरीराच्या अवयवांत मला दुसरी कार्यें आढळतात, जे माझ्या मनातील विचारांशी
लढाई करून, मला वाईट कार्य करणाऱ्या प्रणालीचे गुलाम करीत असतात. 24 मी किती त्रस्त आणि साहाय्यहीन मनुष्य
आहे, मला या मरणाच्या शरीरापासून कोण स्वतंत्र करील? 25 मी आपले स्वामी येशू ख्रिस्तांच्या परमेश्वराचे आभार
मानतो. मी आपल्या मनाने तर नियम आणि आज्ञांचा गुलाम आहे, परंतु वाईट स्वभावाने अपराधांच्या प्रणालीचा
(नियम) गुलाम आहे.

# 8

1 जे लोक ख्रिस्त येशूंमध्ये आहेत आणि वाईट स्वभावाच्या प्रेरणेने (शरीर) नव्हे, तर परमेश्वरी आत्म्याच्या प्रेरणेने
जीवन जगत आहेत त्यांच्यावर दंडाची आज्ञा नाही. 2 कारण ख्रिस्त येशूंद्वारे जीवनाच्या आत्म्याच्या नियमाने, मला
अपराध आणि मरणापासून स्वतंत्र केलेले आहे. 3 परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या आज्ञा आणि नियम, जुन्या स्वभावामुळे
(शरीर) स्वतःठायी बलहीन असे होते. परमेश्वराने त्या आज्ञा आणि नियम ‘अपराधमय’ करून आपल्या पुत्राला
‘बलिदान’ असे केले, 4 यासाठी की जे (आपण) शरीरानुसार नव्हे परंतु आत्म्यानुसार चालतात , त्यांच्यासाठी नियम
आणि आज्ञा यांची उचित मागणी पूर्ण केली जावी.

5 जे लोक वाईट स्वभावाच्या आधारे जीवन जगतात, ते आपल्या दैहिक अभिलाषांवर आपले मन लावतात, परंतु जे
परमेश्वराच्या आत्म्याद्वारे चालतात, ते परमेश्वराच्या आत्म्याच्या इच्छेकडे आपले लक्ष केंद्रित करितात. 6 वाईट
स्वभावाद्वारे आपले अंतःकरण नियंत्रणात केले जाण्याची परवानगी देणे म्हणजे जीवन व्यर्थ करणे होय, परंतु जे
अंतःकरण परमेश्वरी आत्म्याद्वारे अनुशासित व नियंत्रित केले जाते तेथे जीवन आणि शांति आहे. 7 कारण वाईट किंवा
जुन्या स्वभावावर मन लावणे म्हणजे परमेश्वराशी वैर करणे होय, कारण ते परमेश्वरी विधानाप्रत आधीनता स्वीकार
करीत नाही आणि करूही शकत नाही. 8 जे लोक वाईट स्वभावाच्या जाळयांत (शारीरिक दशा) अडकलेले आहेत, ते
परमेश्वराला प्रसन्न करू शकत नाहीत.
9 जर परमेश्वरी आत्मा तुमच्या आंत वास करितो, तर तुम्ही वाईट स्वभावाच्या गुलामीत नाही परंतु आत्मिक दशेत
आहा. जर एखाद्या मनुष्यात ख्रिस्तांचा आत्मा नाही, तर तो ख्रिस्तांचा नाहीये. 10 जर ख्रिस्त तुम्हांमध्ये आहेत, तर जरी
अपराधांमुळे तुमचे शरीर मेलेले असले, तरी नीतिमत्वामुळे तुमचा आत्मा जिवंत आहे. 11 परमेश्वराचा आत्मा ज्याने
ख्रिस्तांना मेलेल्यांतून जिवंत केले जर तुमच्या आंत वसतो, तर ज्याने ख्रिस्तांना मेलेल्यांतून जिवंत उठविले त्या
आत्म्याद्वारे, जो तुमच्या आंत आहे तुमच्या नश्वर शरीरालाही जीवन देईल.
12 म्हणून भाऊबहिणींनो, आपण वाईट इच्छा किंवा वाईट स्वभावाचे (शरीर) कर्जदार (ऋणी) नाही की आपण त्याचे
(ऐकावे) करावे. 13 जर तुम्ही जुन्या स्वभावानुसार जगाल तर मराल, परंतु पवित्र आत्म्याद्वारे शरीराची घाणेरडी व घृणित
कामें माराल तर जिवंत रहाल. 14 यासाठी की जे लोक परमेश्वराच्या आत्म्याद्वारे जीवन जगतात, केवळ तेच त्याचे पुत्र व
कन्या आहेत. 15 त्याचे कारण हेच आहे, की तुम्ही असा आत्मा मिळविला नाही जो तुम्हांला भीति बाळगण्यास गुलाम
करितो, परंतु तुम्ही 'दत्तकपणाचा' आत्मा मिळविलेला (मिळाला) आहे, यासाठीच आपण त्याला 'बापा' म्हणून हाक
मारतो. 16 परमेश्वराचा आत्मा आपल्या स्वतःच्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की आपण परमेश्वराचे पुत्र व कन्या (संतान)
आहोत. 17 जर आपण त्याचे संतान (मुलेंमुली) आहोत, तर आपण वारीसही आहोत, अर्थात ख्रिस्तांबरोबर वारीस आणि
परमेश्वर पित्याचे वारीस. जर आपण ख्रिस्तांच्या दुःखात सहभागी होतो, तर त्यांचा सन्मान व आदरातही सहभागी होऊ.
18 मला वाटते की आपले या समयाचे व दिवसांचे दुःख, त्या सन्मानापुढे जो आपल्यावर प्रगट केला जाणार आहे
तुलना करण्याच्या योग्यतेचा (लायकीचा) नाही. 19 सृष्टि मोठ्या कळकळीने व उमेदीने (अपेक्षेने) परमेश्वराच्या पुत्रांच्या
(संतान) प्रगट होण्याची प्रतिक्षा करीत आहे. 20 कारण सृष्टि तिच्या इच्छेने नष्ट होण्याकरिता, आधीन केली गेली नव्हती
परंतु त्याच्या इच्छेने, ज्याने तिला आधीन केले होते. 21 ते देखील या आशेने की सृष्टि गुलामी आणि कुजण्यापासून
सोडवली जाऊन, परमेश्वराच्या संतानांच्या अद्भुत स्वतंत्रतेमध्ये आणिली जावी.
22 आपल्याला ठाऊक आहे की आजपर्यंत पूर्ण सृष्टि, जणू काही प्रसूतिच्या जोरदार (तीव्र कळ) पिडेसारखी कण्हते
आहे. 23 केवळ सृष्टीच नव्हे तर आपण स्वतः ज्यांच्याजवळ पवित्र आत्म्याचे प्रथम फळ आहे, स्वतःठायी कण्हत
आहोत आणि दत्तक म्हणून घेतले जाण्याची (आपल्या शरीराची सुटका) वाट पाहात आहोत. 24 याच आशेकरिता आपण
तारण देखील प्राप्त केलेले आहे. जर अपेक्षित वस्तु दिसू लागली तर ती आशा नाही, कारण मनुष्य जे पाहातो त्याची
आशा तो करीत राहील? 25 परंतु पण जर आपण न दिसणाऱ्या गोष्टीविषयी आशा बाळगतों, तर आपण त्याच्यासाठी
धीर धरून आशा धरतो.
26 अशाच प्रकारें पवित्र आत्मा आपल्या कमजोरीत (दुर्बलतेत)आपले साहाय्य करितो, कारण आपल्याला ठाऊक
नाही की आपण काय आणि कसे मागावयास हवे. परंतु परमेश्वराचा आत्मा स्वतः आपल्यासाठी, कण्हून अशी प्रार्थना
करितो जी शब्दांत सांगितली जाऊ शकत नाही. 27 जो हृदयाची पारख करितो, त्याला जाणीव आहे की पवित्र आत्म्यांस
काय हवे आहे, कारण तो वेगळे केलेल्या लोकांसाठी परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे प्रार्थना करितो.
28 आपल्याला ठाऊक आहे, की ज्या सर्वांना परमेश्वराचा हेतू पूर्ण (सिद्ध) करण्याकरिता बोलाविलेले आहे आणि जे
त्याच्यावर प्रेम करितात, त्यांच्यासाठी भलेपणाची कृत्यें करण्याकरिताच सर्व काही होत असते. 29 कारण ज्यांना
परमेश्वराने पूर्वीपासून ओळखले होते, त्यांच्याविषयी असा संकल्पही केला होता की त्यांनी त्याचा पुत्र येशूंसारखे व्हावे,
जेणेकरून येशूंनी सबंध विश्वासीं सोबत्यांमध्ये सर्वश्रेष्ठ (ज्येष्ठ) ठरावे; 30 तसेच ज्यांना पूर्वीपासूनच नेमले (ठरविले)

त्यांना बोलाविले देखील आणि ज्यांना बोलाविले, त्यांना निर्दोषी(सिद्ध) असे घोषित केले आणि ज्यांना निर्दोषी घोषित
केले त्यांना आदर व सन्मानही दिला.
[31] या गोष्टींविषयी आपण काय म्हणावे? जर परमेश्वर आपल्यासोबत आहे, तर आपला शत्रु कोण आहे? [32] ज्याने
आपल्या पुत्रालाही राखून ठेविले नाही, पण आपल्या सर्वांकरिता देऊन टाकले, तो परमेश्वर येशूंबरोबर आपल्याला सर्व
काही मोफत (फुकट) का देणार नाही? [33] परमेश्वराने निवडलेल्या लोकांविरूद्ध आरोप कोण प्रमाणित करणार? कारण
परमेश्वर स्वतःच त्या लोकांना दोषमुक्त आणि सिद्ध असे घोषित करून चुकला आहे. [34] कोण त्यांना दोषी ठरविणार?
कारण ख्रिस्तच आहेत जे मेले होते परंतु त्याहून श्रेष्ठ हे की ते जिवंत केले गेले आणि आता सर्वोच्च अधिकारांसमवेत
परमेश्वराबरोबर आहेत व ते आपल्यासाठीचे मध्यस्थ आहेत. [35] ख्रिस्तांच्या प्रेमापासून आपल्याला कोण वेगळे करील?
क्लेश, छळ, दुष्काळ, वस्त्रांची कमतरता, समस्या किंवा हिंसा काय? [36] जसे लिहिले आहे की, ‘तुमच्यामुळे आम्ही
पूर्ण दिवस मारले जातो आहोत, आम्हांला कापावयाची मेंढरें समजले जाते आहे.’
[37] नाही! उलट या सर्व गोष्टींत, ज्या प्रभूने आपल्यावर प्रेम केले त्याच्याठायी आपण जयवंत (विजय प्राप्त करणारे
लोक) नव्हे, तर त्यापेक्षाही श्रेष्ठ आहोत. [38] म्हणून मला खात्री आहे की मरण, जीवन, देवदूत, शासक, सामर्थ्य, वर्तमान
आणि येणाऱ्या समयाच्या गोष्टी, [39] उंची, खोली आणि कोणतीही रचलेली वस्तु, आम्हांला परमेश्वराच्या प्रेमापासून जे
आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांमध्ये आहे, वेगळे करू शकण्यास समर्थ नाही.

## 9

[1] मी ख्रिस्तांमध्ये खरे बोलतो आहे, मी खोटे बोलत नाहीये. माझा विवेकही, पवित्र आत्म्यांत साक्ष देतो आहे, [2] की
माझ्या हृदयावर एक जड ओझे आणि कायम राहणारे दुःख आहे. [3] जे इस्त्राएली लोक माझे नातेसंबंधी, आहेत
त्यांच्यामुळे मी ख्रिस्तांद्वारे दंडास पात्र ठरलो असतो तर फार बरे झाले असते. [4] दत्तकपणाचा हक्क आणि महिमा, करार,
नियम, आज्ञांचे दिले जाणे, परमेश्वराची सेवा आणि अभिवचनें ही इस्राएली लोकांसाठी आहेत. [5] पूर्वज त्यांचेच आहेत,
शारीरिकदृष्टया पाहिले तर ख्रिस्त जे यहूदी लोकांतून आले होते ते सर्वांच्या वर आहेत, ते परमेश्वर आहेत आणि
युगानुयुग प्रशंसनीय आहेत, होय, असेच होवो.
[6] असे नाही की परमेश्वराने म्हटलेले (वचन) पूर्ण झाले नाही, कारण जे इस्त्राएलाचे वंशज आहेत ते सर्वच इस्त्राएली
नाहीत. [7] जरी ते अब्राहामाच्या वंशाचे आहेत तरी ते सर्व अब्राहामाचे संतानही नाहीत परंतु असे, की ‘इसहाकाद्वारेच
जन्मलेल्यांना तुझा वंश (संतान) असे म्हणतील’ [8] याचा अर्थ असा आहे, की जे लोक केवळ दैहिक रीतिने यहूदी वंशात
जन्मले आहेत, ते परमेश्वराचे संतान नाहीत, पण खरे पाहिले तर अभिवचनाचे संतानच 'वास्तविक' संतान म्हणविले
जातील. [9] प्रतिज्ञा (अभिवचन) ही आहे की ‘याच समयी मी येईन आणि सारेला एक पुत्र होईल.’
[10] इतकेच केवळ नव्हे तर ज्या वेळी रिबकाही इसहाकापासून गर्भवती झाली, [11] ती मुलें जी अजून जन्मली नव्हती,
किंवा ज्यांनी बरेवाईट केले नव्हते,ती परमेश्वराचे सन्तान ठरणे त्यांच्या कर्मांवर अवलंबून नव्हते, परंतु त्यांच्या
निवडीवर अवलंबून होते [12] यासाठी की परमेश्वराचा हेतू कायम रहावा जो कर्मांमुळे नाही, परंतु परमेश्वराच्या निवडीवर
अवलंबून आहे आणि परमेश्वर जो स्वतः बोलावितो त्याने तिला सांगितले होते, की “मोठा छोटयाची सेवा करील.”
[13] जसे लिहिले आहे की, ‘मी याकोबावर प्रेम केले आणि एसावाला अप्रिय जाणले.’
[14] म्हणून आता आपण काय म्हणावे? परमेश्वर अन्यायी आहे काय? मुळीच नाही. [15] यासाठी की तो मोशेला म्हणतो,
“ज्या कोणावर, मला दया करावयाची (हवे) आहे मी करीन,
[16] आणि ज्या कोणावर करूणा प्रगट करावयाची आहे मी प्रगट करीन” यास्तव परमेश्वराची भलेपणाची कृत्यें, प्रयत्न
किंवा मनोकामना याद्वारे प्राप्त केली जाऊ शकत नाहीत. [17] पवित्रशास्त्राप्रमाणे (बायबल), परमेश्वर मिसरचा राजा फारो
याला म्हणाला, “मी तुला यास्तव उभे केले आहे की आपले सामर्थ्य तुमच्यामध्ये दाखवावे आणि माझ्या नांवाची
घोषणा सर्व पृथ्वीवर केली जावी”, [18] म्हणूनच ज्या लोकांवर दया प्रगट करण्याची त्याची इच्छा असेल त्यावर तो दया

प्रगट करील आणि ज्यांना कठोर करण्याची त्याची इच्छा आहे, त्यांना कठोर करील.
[19] त्या वेळी तू मला म्हणशील, की “परमेश्वर पुन्हा दोष का शोधीत असतो? त्याच्या इच्छेचा विरोध कोणी केला
आहे? [20] हे मानवा तू कोण आहेस की परमेश्वराला उत्तरांची मागणी करावी? रचना झालेली वस्तु त्याच्या रचनाकाराला
विचारू शकतें काय, की “तू मला असे का बनविलेस (रचलेस)?” [21] कुंभाराला अशी सूट नाही काय की त्याने
मातीच्या एकाच गोळयांपासून, उत्तम आणि विशेष उपयोगासाठी एखादे पात्र करावे आणि दुसरे पात्र साधारण व
हलक्या उपयोगासाठी करावे?”
[22] परमेश्वर आपला क्रोध आणि आपले सामर्थ्य प्रगट करण्याकरिता सज्ज (तयार) झाला असताना जी नष्ट व्हावयाची
होती, अशी दंड पात्रें त्याने मोठ्या धीराने व सहनशीलतेने सहन करून घेतली. [23] याकरिताच त्याने आपल्या
महिमेसाठी दया पात्रें पूर्वीपासून तयार केली, की त्यांच्यावर आपले गौरव प्रगट करावे. [24] यांपैकी आपण सर्वच
बोलाविलेले (पाचारण) आहोत, मग ते यहूदी लोकांतून असोत की गैरयहूदी लोकांतून. [25] जसे होशेयाच्या पुस्तकांत
लिहिले आहे : ‘जे माझे नव्हते त्यांना मी माझे (आपले) लोक म्हणेन,’ [26] असे होईल की जेथे त्यांना म्हटले गेले होते,
तुम्ही माझे लोक नाहीत तेथेच त्यांना परमेश्वराचे संतान म्हटले जाईल.’
[27] इस्त्राएलाविषयी यशया असे पुकारून म्हणतो, “जरी इस्त्राएलाच्या वंशाची संख्या समुद्राच्या वाळूसारखी असली,
तरी मूठभर लोकच वाचविले (उद्धार) जातील, [28] कारण परमेश्वर आपले कार्य या पृथ्वीवर वचनाने लवकरच पूर्ण
करील.” [29] एका दुसऱ्या ठिकाणी यशया असे म्हणतो, “जर सेनाधीश प्रभू परमेश्वराची कृपादृष्टि झाली (प्रगटली) नसती,
तर सर्व यहूदी नाश करून टाकले गेले असते, अगदी त्याचप्रमाणे जसे सदोम आणि गमोरा नांवाच्या शहराचे लोक नाश
पावले होते.”
[30] यावर आता आपण काय म्हणावे, हेच की गैरयहूदी लोकांची मनीषा (इच्छा) परमेश्वरासमोर नीतिमान ठरविले
जाण्याची नव्हती, तरी ते नीतिमान ठरले कारण तो आशीर्वाद त्यांनी विश्वासाने मिळवला होता. [31] परंतु इस्त्राएल
आपल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याद्वारे 'नीतिमान' ठरविले जाण्याचा आशीर्वाद प्राप्त करू इच्छित होता परंतु
मिळवू शकले नाही. [32] असे का? हे अशासाठी झाले, कारण विश्वासाऐवजी तो आशीर्वाद त्यांनी नियमांच्या पालनाद्वारे
प्राप्त करण्याचा प्रयत्न केला होता आणि मार्गातील ठेचाळणाऱ्या धोंड्यामुळे ते ठेचाळलेत, [33] जसे लिहिले आहे, “पहा,
मी यहूद्यांमध्ये सीयोनांत अडचणीचा एक असा खडक, अर्थात येशूंना ठेवले आहे ज्यांना ते प्रिय जाणणार नाहीत, परंतु
जो कोणी येशूंवर विश्वास ठेवील त्याला लाज वाटणार नाही.”

# 10

[1] भावांनोबहिणींनो, इस्त्राएलाविषयी माझी इच्छा (अभिलाषा) आणि प्रार्थना हीच आहे की त्यांचा उद्धार व्हावा. [2] मी
त्यांच्याविषयी असे म्हणू शकतो की त्यांच्या अंतःकरणात परमेश्वराकरिता मोठा उत्साह आहे पण हे ज्ञानानुसार नाहीये.
[3] कारण परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या नीतिमत्वाविषयी ते अज्ञानी आहेत आणि स्वप्रयत्नांनी आपल्या स्वतःला सिद्ध
प्रमाणित करू इच्छितात, म्हणूनच त्यांनी परमेश्वराच्याकडून मिळणारे सिद्धतेप्रत (नीतिमत्व) समर्पण नाकारले, [4] कारण
जो कोणी विश्वास करितो त्या विश्वासीसाठी ख्रिस्त, नियमआज्ञांचा अंत असे आहेत.
[5] नियमशास्त्रानुसार जे नीतिमत्व आहे, त्याचे वर्णन मोशे अशा प्रकारे करितो : ‘जो मनुष्य नियमशास्त्रातील नियमांचे
पालन करितो, तो त्यांच्याद्वारे जिवंत राहील.’ [6] जे नीतिमत्व (सिद्ध ठरविले जाणे) विश्वासावर आधारलेले आहे, ते असे
बोलते : “आपल्या हृदयांत म्हणू नकोस, कोण स्वर्गात जाईल? (ख्रिस्तांना खाली आणावयास)” किंवा [7] “अधोलोकांत
कोण उतरेल? (ख्रिस्तांना मेलेल्यांतून जिवंत उठविण्यास)”.
[8] तर ते काय म्हणते? हेच की, “ते वचन तुझ्या मुखांत आणि अंतःकरणांत आहे, (तेच वचन जे आम्ही गाजवीत
आहोत); [9] ते असे आहे की जर तू आपल्या मुखाने येशू प्रभूंचा (स्वामी) स्वीकार करशील, आणि आपल्या अंतःकरणात
असा विश्वास बाळगशील, की परमेश्वराने त्यांना (येशू) मेलेल्यांतून जिवंत उठविले तर तुला मुक्ति मिळेल. [10] निर्दोषी

ठरविले जाण्यासाठी, हृदयाने (आत्मा) विश्वास ठेवला जातो आणि मुक्तीसाठी मुखाने अंगिकार (मान्य) केला जातो.
[11] जसे की, बायबलमध्ये आधीच म्हटले आहे की : “जो कोणी त्यांच्यावर विश्वास ठेवतो, त्याला कधीही लाज
वाटणार (लाजिरवाणे व्हावे लागणार) नाही.” [12] म्हणून यहूदी आणि गैरयहूदी यांत कोणतेच अंतर नाही, कारण त्या
दोहोंच्यावर येशू स्वामी आहेत, म्हणजे जे त्यांचा धावा करून त्यांना हाका मारतात व [13] जो कोणी प्रभूंचे नांव घेईल तो
वाचेल.

[14] ज्यांच्यावर त्या लोकांनी विश्वास ठेवलेला नाही, ते त्यांना का पुकारतील? त्यांचा धावा करून त्यांना हाका का
मारतील? ज्यांनी विश्वास ठेवलेला नाही, ते येशूंवर विश्वास कसे ठेवतील? आणि जोवर संदेश देणारे पाठविले जात
नाही, तोवर ते संदेश (येशूवार्ता) कसा ऐकतील? ज्यांच्याविषयी त्यांनी ऐकले नाही, त्यांच्यावर ते कसे विश्वास
ठेवतील? संदेशवाहकांशिवाय ते ऐकणार तरी कसे? [15] आणि जर येशूवार्ता देणारे पाठविले गेलेच नाहीत तर ते कशा
प्रकारे घोषित करतील? जसे लिहिले आहे की, ‘जे लोक शांतीची येशूवार्ता गाजवितात आणि चांगल्या गोष्टींचा समाचार
आणतात, त्यांचे पाय किती सुंदर आहेत.’

[16] परंतु सर्वच लोकांनी येशूवार्ता स्वीकार केलेली नाही. जसे यशया म्हणतो, “हे प्रभू, आमच्या सुवार्तेवर कोणी
विश्वास ठेवला आहे?”

[17] म्हणूनच विश्वास ऐकण्याने आणि ऐकणे, परमेश्वराच्या वचनांपासूनचे आहे. [18] पण मी विचारतो की त्यांनी का ऐकले
नाही? त्यांनी ऐकले नव्हते काय? होय, त्यांनी खरोखरच ऐकलेले आहे : कारण लिहिले आहे, ‘प्रभूची वाणी संपूर्ण
पृथ्वीवर आणि त्याचे शब्द विश्वाच्या शेवटापर्यंत (सर्व दिशांत) पोहचले आहेत.’

[19] पण मी म्हणतो, की “इस्त्राएलांना याविषयी ठाऊक नाही काय? मोशे प्रथम असे म्हणतो की, जे लोक, एक राष्ट्र
(जाती) नाहीत, त्यांच्याद्वारें मी तुम्हांला ईर्षाखोर, मत्सरी व त्यांच्याविषयी हेवा वाटणारे असे करणार, एका मूर्ख
राष्ट्राद्वारे मी तुम्हांला क्रोधित (राग भडकविणार) करणार”. पण यशया बहुत धाडसी आहे आणि तो धीटाईने म्हणतो,
[20] “जे मला शोधीत नव्हते, त्यांनीही मला मिळविले व ज्यांनी माझ्याविषयी काहीही विचारले नाही, त्यांच्यावर मी प्रगट
झालो.”

[21] पण इस्त्राएलाविषयी तो म्हणतो, “बराच वेळ आज्ञापालन न करणाऱ्या आणि बंड करून, विसंगत बोलणाऱ्या
लोकांकडे मी आपले हात पसरले आणि वाट पाहात राहिलो.”

# 11

[1] म्हणून मी म्हणतो, “परमेश्वराने आपले लोक हाकून लावले आहेत काय?” मुळीच नाही! मी सुद्धा इस्त्राएली,
अब्राहामाच्या कुळातील आणि बन्यामिनाच्या वंशाचा आहे. [2] ज्या लोकांविषयी परमेश्वराला पूर्वीपासून ठाऊक होते,
त्यांना परमेश्वर पित्याने टाकून दिले नाही. एलियाविषयी वचन काय म्हणते, तुम्हांला ठाऊक आहे काय?
इस्त्राएलाविरूद्ध तो अशी विनंती करितो आणि म्हणतो, [3] “स्वामी, त्यांनी आपले संदेष्टे जिवें मारले आहेत आणि
आपल्या वेद्या धुळीला मिळवून जमीनदोस्त करून टाकल्या आहेत.

[4] केवळ मी एकटाच काय तो राहिलो (वाचलो) आहे आणि ते मला जिवें मारावयाचे पाहात आहेत”. परमेश्वराचे उत्तर
काय होते? “मी आपल्यासाठी सात हजार लोक राखून ठेवले आहेत, ज्यांनी आपले गुडघे बआल देवतापुढे टेकलेले
नाहीत”

[5] त्याचप्रमाणे या समयी देखील दयेच्या निवडीआधारे काही लोक उरलेले आहेत. [6] आणि जर ते कृपेने (दयेने) असेल
तर मग कर्मांना कोणतेच स्थान नाही. नाहीतर कृपा, कृपा म्हणवली गेली नसती परंतु जर हे सर्व कार्यांनुसार आहे, तर ते
अपरिमित दयेमुळे नाही अन्यथा कर्म पुन्हा कधी कर्म राहिले नसते.

[7] मग काय? ज्याची कामना व इच्छा इस्त्राएलाने केली होती ते त्याला मिळाले नाही. परंतु निवडलेल्या लोकांनी ते
प्राप्त केले, दुसऱ्या सर्व लोकांची अंतःकरणें कठोर झालीत. [8] जसे लिहिले आहे की, ‘याच कारणाने परमेश्वराने त्यांना

एक निरूत्साही आत्मा दिला आहे, असे डोळे दिले ज्यांनी दिसत नाही, असे कान ज्यांनी ते आजवर ऐकू शकत नाहीत.'
9 दावीद म्हणतो की, "त्यांचे आशीर्वाद त्यांच्यासाठी एक फांस, जाळें आणि ठेचाळण्याचा धोंडा असे प्रतिफळ
(परिणाम) होवो,
10 त्यांचे डोळे इतके अंधकारमय होवोत, की त्यांना दिसू नये, त्यांची पाठ कायम वाकलेली असो."
11 यास्तव मी म्हणतो, की "ते याकरिता अडखळले काय की त्यांनी खाली पडावे?" नाहीच मुळी! परंतु त्यांच्या
अपयशामुळे त्यांच्यात ईर्ष्या निर्माण करण्यासाठी, मुक्ति गैरयहूदी लोकांपर्यत जाऊन पोहचली आहे. 12 आता जर
त्यांच्या अपयशाचा अर्थ जगाकरिता संपत्ति आहे, आणि हानिचा अर्थ गैरयहूदी लोकांसाठीची विपुलता आहे तर विचार
करा, की शेवटी जेव्हा ते परमेश्वरी मुक्तीचे बक्षिस स्वीकार करून घेतील, तेव्हा ती किती उत्तम व गडगंज श्रीमंती
असेल .
13 मी तुम्हां गैरयहूदी लोकांना उद्देशून म्हणतो आहे, की तुम्हांलाच येशूवार्ता सांगण्यासाठी मला पाठविलेले आहे
आणि मी ही सेवा एक खूप महत्वाची व मोठी गोष्ट समजतो. 14 माझ्या जातीतील लोकांच्या मनांत ईर्ष्या निर्माण करून,
कशा प्रकारेही तारणाच्या मार्गावर आणून त्यांना मुक्त करावे असे मला हवे (इच्छा) आहे. 15 जर त्यांचा नकार
जगासाठीचा मेळ आहे, तर त्यांनी ख्रिस्तांचा स्वीकार करणे म्हणजे, मरणाचे जीवनात परिवर्तन होणे हेच असेल ना?
16 जर प्रथम फळाच्या (कणिकेचा गोळा) रूपात प्रथम समर्पित केलेले, पवित्र असेल तर उरलेलेही पवित्रच ठरील. जर
मूळ पवित्र असेल तर फांद्याही पवित्र ठरतील.
17 जर काही फांद्या तोडल्या गेल्या आणि, तू जो जंगली जैतुनाच्या झाडांवर आहेस, फांद्यांत कलम-रूपाने लावला
गेलास तर आता, जैतुनाचे मूळ आणि तेलाचा भागीदार झाला आहेस. 18 फांद्यांविषयी गर्व करू नको, जर तू गर्व करीत
असलास तर याद राख, की तू मूळाला सांभाळत नाहीस, परंतु मूळ तुला सांभाळते. 19 म्हणून तू म्हणशील, "फांद्या
यास्तव तोडल्या गेल्या की कलम केले जावे"; 20 तुझे म्हणणे बरोबर आहे, पण अविश्वासामुळे त्या वेगळया केल्या
गेल्या, आणि तू विश्वासामुळे स्थिर रहातोस. गर्व करू नको पण भीति बाळग, 21 याकरिता की जर परमेश्वराने
स्वाभाविक फांद्यांची पर्वा करून त्या राखिल्या नाहीत, तर तुम्हांलाही तो सोडणार (राखणार) नाही.
22 म्हणून परमेश्वराचा कठोरपणा आणि चांगुलपणा पहा, जे लोक अपयशी ठरले त्यांच्याशी कडकपणा, परंतु
तुझ्याबरोबर चांगुलपणा. परंतु त्याच्या करूणेंत राहिलास तरच, नाहीतर तू देखील छाटला (कांपला) जाशील. 23 आणि
जर ते आपल्या अविश्वासात कायम राहिले नाहीत, तर कलमरूपाने लावले जातील कारण परमेश्वर त्यांना पुन्हा एकवार
कलम करण्यास समर्थ व योग्य आहे. 24 कारण जर तू जंगली जैतुनाच्या झाडांतून कापला गेला होता, ज्याचा स्वभाव
जंगली होता, त्याच्या स्वभावाविपरित एका चांगल्या जैतुनाच्या झाडांत तुझे कलम केले, तर परमेश्वर किती सोप्या
रीतिने या स्वाभाविक फांद्यांचे रोपण, त्याच्या स्वतःच्या जैतुनाच्या झाडात करील!
25 माझ्या भाऊबहिणींनो, तुम्ही स्वतःच्या दृष्टीत बुद्धीमान होता कामा नये म्हणून, तुम्ही या रहस्याविषयी अजाण
असावे असे मला नकोय, अर्थात ते रहस्य जाणून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. जोपर्यंत गैरयहूदी लोकांच्या भरपूरीचा
(विपुलतेचा) समय येत नाही, तोपर्यंत इस्त्राएलाचा हा अपूर्ण आंधळेपणा आहे. 26 म्हणूनच इस्त्राएल वाचविला जाईल
अर्थात तारण प्राप्त करील, जसे लिहिले आहे, की 'सोडविणारा सीयोनातून बाहेर येईल आणि अभक्ति (घृणित-जीवन)
याकोबापासून दूर करील. 27 तेव्हा मी त्यांचे अपराध त्यांच्यापासून दूर करीन आणि मी त्यांच्याशी केलेला हा न
बदलणारा करार (वचन) आहे'.
28 येशूवार्तेविषयी ते तुमचे वैरी आहेत, परंतु परमेश्वर-निवडीच्या दृष्टिने पित्याने पूर्वजांवर प्रेम केले गेले आहे.
29 परमेश्वराचे कृपादान आणि पाचारण (बोलाविणे) परत घेतले जात नाही. 30 ज्या प्रकारे पूर्वी तुम्ही परमेश्वराच्या आज्ञा
पाळत नव्हता, परंतु त्यांच्या आज्ञा उल्लंघनाने आता तुम्ही कृपा प्राप्त केली आहे. 31 ते आतापर्यंतही आज्ञा पाळणारे
राहिले नाहीत, अशासाठी की तुमच्यावर प्रगट केलेल्या कृपेने त्यांनीही कृपा प्राप्त करावी. 32 परमेश्वराने त्या सर्वांना
आज्ञा उल्लंघनांत जखडून व डांबून ठेवले आहे, जेणेकरून त्या सर्वांवर त्याची कृपा व्हावी. 33 अहाहा, सृष्टीकर्ता
परमेश्वर! त्याच्या ज्ञानाची व बुद्धीची खोली, त्याचे निर्णय व पद्धती किती रहस्यमय आहेत. 34 परमेश्वराचे विचार काय

आहेत, हे कोणी ओळखून घेतले आहे, कोण त्याला सल्ला देऊ शकतो? 35 किंवा प्रथम कोणी त्याला दिले, की
देणाऱ्याला परत केले जावे? 36 कारण सर्व काही त्याच्याकरिता, त्याच्या शक्तीद्वारे आणि त्याच्यापासूनच आहे. त्याची
स्तुति व त्याचा महिमा युगानुयुग होत राहो. होय, असेच होवो.

## 12

1 म्हणून हे भाऊबहिणींनो, परमेश्वराची कृपा स्मरण करून मी तुम्हांला विनंती करितो की तुम्ही आपले शरीर एक
जिवंत, पवित्र आणि परमेश्वराला प्रिय असे बलिदान म्हणून अर्पण करावे, कारण तीच तुमची आत्मिक सेवा आहे; 2 या
जगासारखे होऊ नका, परंतु आपल्या अंतःकरणाच्या (मनाच्या) रूपातरणांमुळे (पालट) आपले नूतनीकरण करीत
चला, जेणेकरून तुम्हांला परमेश्वराच्या सिद्ध, उत्तम आणि ग्रहणीय इच्छेची पुष्टि करिता यावी. 3 मला प्राप्त झालेल्या त्या
मोठ्या कृपेमुळे मी तुमच्यांपैकी प्रत्येकाला सूचना देतो, की कोणत्याही मनुष्याने स्वतःला दुसऱ्यांपेक्षा अधिक श्रेष्ठ
समजू नये. परमेश्वराने प्रत्येकाला ज्या मापाने विश्वास दिलेला आहे, त्याच्याच आधारावर स्वतःला समजून घ्यावे.
4 ज्या प्रकारे आपल्या सर्वांच्या शरीरात पुष्कळ अवयव आहेत आणि सर्व अवयवांचे कार्य एकसारखे नाही,
5 त्याचप्रमाणे आपण संख्येने विपुल आहोत, परंतु ख्रिस्तांच्या शरीरात एक आहोत आणि एकमेकांसाठी आपण
एकमेकांचे सहभागी (अवयव) आहोत. 6 मिळणाऱ्या असीमित कृपेमुळे (अनुग्रह) आपल्याला वेगवेगळी कृपेची दानें
मिळालेली आहेत. जर भविष्यवाणीचे (ईश्वरी संदेश) दान असेल तर विश्वासाच्या मापानुसार भविष्यवाणी करावी. 7 जर
सेवा करण्याचे दान असेल, तर त्याने सेवेत तत्परतेने रमलेले असावे. जर शिकविण्याचे दान आहे, तर शिकविण्यात
व्यस्त रहावे. 8 प्रोत्साहन व उत्तेजन देणाऱ्याने लोकांची हिंमत वाढवीत जावी, जो दान देतो त्याने हृदयाच्या औदार्याने
(उदारतेने) देत जावे, जो पुढाकार घेतो त्याने गांभीर्याने पुढारीपण करावे. जो करूणा प्रगट करितो, त्याने ती आनंदाने
प्रगट करावी.
9 प्रेमात ढोंग (भोंदूगिरी) नसावे. वाईटाचा तिरस्कार करा व चांगले ते कवटाळून रहा. 10 बंधुप्रेमाने ओतप्रोत होऊन
एकमेकांप्रत समर्पित रहा. आदराविषयी सांगतो की आपल्याहून अधिक दुसऱ्यांचा आदर (सन्मान) करा. 11 आपल्या
उत्साहात कमी पडू नका, परंतु आत्म्यात उत्सुक होऊन सेवा करीत रहा; 12 आशेत प्रसन्न रहा, स्वभावात धीर बाळगा,
प्रार्थनेत स्थिर व कायम रहा. 13 पवित्र लोकांच्या गरजा भागवीत जा आणि पाहुणचार करण्यात पुढाकार घ्या.
14 जे लोक तुम्हांला छळतात त्यांना आशीर्वाद द्या, शाप नव्हे पण आशीर्वादच द्या. 15 जे लोक आनंदी आहेत,
त्यांच्याबरोबर आनंदी असा, जे रडतात, त्यांच्याबरोबर विलाप करा. 16 एकमेकांकरिता उत्तम विचार बाळगा. आपल्या
स्वतःला दुसऱ्यांहून अधिक श्रेष्ठ (उत्तम) समजू नका, परंतु लहान व लीन समुदायाच्या लोकांबरोबरही मेळ राखा.
आपण खूप बुद्धीमान आहोत असे मुळीच समजू नका;
17 एखाद्याने तुमचे वाईट केल्यास, सूड घेऊ नका. सर्व लोकांच्या दृष्टीने जे सर्वोत्तम (उत्कृष्ट) त्यालाच महत्व द्या.
18 शक्य होईल तितके, प्रत्येकाबरोबर शांतीने रहा. 19 प्रिय मित्रांनो, सूड घेऊ नका परंतु ते कार्य परमेश्वराकडे सोपवून
द्या. कारण लिहिले आहे, ‘सूड घेणे हे माझे कार्य आहे, प्रभू असे म्हणतो मी चुकते करीन’. 20 म्हणून जर तुझा शत्रु
भुकेला असेल (आहे) तर त्याला भोजन दे, जर तो तान्हेला आहे तर त्याला प्यावयास दे. असे केल्याने तू त्याच्या
मस्तकावर, जळत्या कोळश्यांची रास करशील.
21 वाईटाने पराजित होऊ नको परंतु बऱ्याने वाईटाला जिंकून घे.

## 13

1 प्रत्येक व्यक्तिने सरकारच्या आधीन असावयास हवे, कारण सर्व प्रकारचे अधिकार परमेश्वराकडून आहेत. जे
अधिकारीगण आहेत, त्यांना परमेश्वराने नियुक्त होऊ दिलेले आहे. 2 म्हणून, जो कोणी अधिकारांखाली (आधीन) येत

नाही तो परमेश्वराद्वारे नेमलेल्या प्रबंधांचा विरोध करतो. जे लोक असे करितात त्यांना दंड मिळेल, 3 कारण
अधिकारीवर्ग चांगले काम करणाऱ्यांना दंड देत नाहीत, परंतु वाईट करणाऱ्यांना देतात. तू अधिकाऱ्यांच्या भीतिशिवाय
जीवन जगू इच्छितोस काय? तर मग जे कांही चांगले आहे, तेच कर आणि तो तुला शाबाशी देईल. 4 कारण
परमेश्वराकडून, तो चांगले करणाऱ्यासाठींचाच नेमला गेलेला असा तुमचा सेवक आहे. जर तुम्ही वाईट करिता तर भ्या,
कारण त्याला दंड देण्याचा अधिकार असाच मिळालेला नाहीये! तो परमेश्वर पित्याचा सेवक आहे, जेणेकरून त्याने
वाईट करणाऱ्यांना दंड द्यावा. 5 म्हणून आपल्या विवेकामुळे तुम्ही अधिकाऱ्यांचे मानावे, दंडाच्या भीतिने नाही.
6 याच कारणास्तव तुम्ही कर चुकता करिता ना? कारण अधिकारी परमेश्वराच्या सेवकाच्या रूपात निरंतर आपल्या
जवाबदाऱ्या पूर्ण करीत असतो. 7 म्हणून ज्याचा जो हक्क आहे, तो त्याला द्या. ज्याला कर (टॅक्स) द्यावयाचा आहे त्याला
कर द्या, ज्याची भीति बाळगावयास हवी, त्याची भीति धरा. ज्याचा सन्मान व आदर केला जाणे आवश्यक आहे,
त्याचा सन्मान करा.
8 आपसांतील प्रेमाशिवाय आणखी कोणत्याही बाबतींत कोणाचाही कर्जदार राहू नको. जो दुसऱ्यांवर प्रेम करितो तो
परमेश्वराच्या नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन करितो. 9 ज्या आज्ञा आहेत जसे : तू व्यभिचार करू नको, हत्या करू नको,
चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, लोभ धरू नको आणि दुसऱ्या इतर ज्या आज्ञा आहेत, त्या सर्वांचा थोडक्यात
केलेला सारांश यांतच आहे: ‘तू लोकांवर तेवढे प्रेम कर, जितके आपल्या स्वतःशी करितो’, प्रेम कोणाची हानि करीत
नाही. 10 म्हणूनच ज्याने प्रेम केले, त्याने परमेश्वर पित्याने दिलेल्या सर्वच नियमांचे पालन केलेले आहे.
11 या व्यतिरिक्त तुम्ही जाणता की वर्तमान काळातील समय हा संकटांनी भरलेला समय आहे, आणि म्हणून तुम्ही
वास्तविकता जाणून घ्यावी. ज्या वेळी आपण विश्वासात आलो होतो, त्या तुलनेत आता आपला उद्धार आणखी जवळ
आलेला आहे. 12 रात्र संपते आहे, दिवस उजाडणार आहे. म्हणून आपण अंधारात केली जाणारी कृत्यें फेकून (सोडून),
प्रकाशाची हत्यारें धारण करू या. 13 चला, आपण प्रकाशाला शोभेल असे सभ्यपणाचे जीवन जगू या. लीलाक्रिडा,
मद्यपान, चुकीचे यौन संबंध (बेकायदेशीर) अनियंत्रित कामवासना, तंटे आणि ईर्ष्या या सर्वांनी भरलेले जीवन नाही.
14 नव्हे, तुम्ही येशू ख्रिस्तांना नेसून घ्यावे, आणि जुन्या स्वभावाच्या अभिलाषा पूर्ण करण्याकरिता उपलब्ध असलेल्या
तरतूदी करण्याचा विचारही करू नये.

## 14

1 जो विश्वासात नवीन (विश्वासाला सुरवात करणारा) आहे, त्याला ग्रहण करा (जवळ घ्या), आणि शंका असलेल्या
विषयांवर वादविवाद करू नका. 2 एखादा असे मानतो की सर्व काही खाल्ले जाऊ शकते, दुसरा व्यक्ती खाण्याच्या
सामग्रीविषयी वेगळया प्रकारचे विचार बाळगतो आणि म्हणून तो केवळ शाकभाजीच खातो. 3 याच कारणास्तव जो
सर्व काही खातो त्याला, त्या व्यक्तिने तुच्छ (नीच) समजू नये जो सर्व काही खात नाही. जो सर्व काही खातो त्याने त्या
व्यक्तिची टीका करू नये, (त्याच्याविषयी वाईट बोलू नये), कारण परमेश्वराने त्यालाही स्वीकार केले आहे. 4 तुम्ही
कोण आहा की परमेश्वराच्या व्यक्तिला (जण) दोषी ठरवावे? असा व्यक्ती प्रभूसमोर स्वतः जबाबदार आहे. कारण
परमेश्वर त्याला स्थिर ठेवण्यास सामर्थी आहे.
5 एक मनुष्य असा विचार करितो की एखादा दिवस दुसऱ्या दिवसापेक्षा ठीक (बरा) आहे, दुसरा व्यक्ती विचार
करितो की प्रत्येक दिवस एकसारखाच आहे, याविषयी प्रत्येकाने आपले अंतःकरण राजी करून घ्यावे. 6 जो एखादा
दिवस विशेष (खास) जाणतो तो येशूंसाठी तसे करितो, ज्याच्याकरिता एखादा दिवस खास नसतो, तोही प्रभूकरिताच
असे करितो. जो मनुष्य सर्व काही खातो, तो येशूंसाठीच परमेश्वराचे आभार मानून खातो, त्याचप्रमाणे जो मनुष्य सर्व
काही खात नाही, तो देखील धन्यवाद देऊन तसेच करितो. 7 आपल्यांपैकी कोणीही स्वतःसाठी जिवंत रहात नाही
किंवा मरत नाही. 8 म्हणून जर आपण जिवंत आहोत, ते येशूंकरिता व जर मरण पावतो ते येशूंकरिता. म्हणून आपण
जगलो किंवा मेलो तरी आपण येशूंचेच आहोत.

9 याच कारणास्तव येशूंनी आपला जीव दिला, जिवंत उठले आणि जिवंत आहेत, जेणेकरून मेलेल्यांचा आणि
जिवंतांचाही स्वामी ठरावे. 10 तू आपल्या भावाला दोषी का ठरवितोस किंवा त्याला तुच्छ का लेखितोस? कारण
आपण सर्वचे सर्व ख्रिस्तांच्या राजासनासमोर उभे राहू. 11 जसे लिहिले आहे की, प्रभू म्हणतो, “मी जिवंत आहे, प्रत्येक
गुडघा माझ्यापुढे टेकला जाईल आणि प्रत्येक जीभ परमेश्वराचा अंगिकार करील”.
12 कारण आपल्यांपैकी प्रत्येक जण आपआपला हिशेब परमेश्वराला देईल.
13 यास्तव यापुढे आपण दुसऱ्यांवर दोष लावू नये,परंतु या गोष्टीकडे लक्ष द्यावे, की कोणत्याही मनुष्याने आपल्या
भावाच्या जीवनात अडखळणाचे कारण किंवा अडचण होऊ नये.
14 मला ठाऊक आहे आणि येशू ख्रिस्तांद्वारे मी निश्चिंत आहे, की खाण्याची कोणतीही भोजन वस्तु मूळची अशुद्ध
नसते, परंतु जो मनुष्य कोणतीही भोजन वस्तु अशुद्ध समजतो, त्याच्याकरिता मात्र ती अशुद्ध आहे; 15 तुमचा भाऊ
तुमच्या भोजनामुळे (खाण्यामुळे) दुःखी होत असेल, तर तुम्ही प्रेमपूर्ण जीवन जगत नाही. आपल्या भोजनामुळे एखादा
मनुष्य नाश करू नको कारण त्याच्यासाठीही ख्रिस्त मरण पावले होते. 16 तुमची भलेपणाची कृत्यें वाईट समजून त्यांची
निंदा होता कामा नये, 17 कारण परमेश्वरपित्याचे राज्य खाणेपिणे नव्हे परंतु परमेश्वराच्या दृष्टीने निर्दोषी ठरविले जाणे,
आणि शांति व आनंद आहे आणि तो पवित्रात्म्याद्वारे होत असतो. 18 जे लोक या सर्व गोष्टींत ख्रिस्तांची सेवा करितात,
त्यांचा स्वीकार परमेश्वरही करितो आणि ते मनुष्यांद्वारे ग्रहणीय आणि व्यवस्थित (बरोबर) ठरविले जातात.
19 म्हणून ज्यामुळे मित्रभाव निर्माण होतो आणि ज्यांच्या साहाय्याने आपण एकमेकाला बळवंत करू शकतो त्या गोष्टी
आवडून घ्या, त्या प्रिय जाणा. 20 भोजनसारख्या (खाणे) आवश्यक बाबींकरिता परमेश्वराचे कार्य नष्ट करू नका. सर्व
प्रकारची खाद्यसामग्री (पदार्थ) अगदी शुद्ध आहे, पण जो दुसऱ्यांना दुःखी करून खातो, त्याच्यासाठी ते वाईट आहे.
21 तुझ्या भाऊबहिणींना ठेच लागेल, तो नाराज होईल किंवा कमजोर होईल, अशा प्रकारचे खाद्य-अर्थात मांस, मद्यपान
किंवा आणखी अशा वस्तु ज्यांच्यामुळे तो अडखळतो, यांचे सेवन तू न केलेलेच बरे आहे.
22 तुमच्याठायी जो विश्वास आहे तो आपल्या परमेश्वरासमोर कायम असू द्या. आशीर्वादित(धन्य) तो मनुष्य आहे, जो
स्वतःला त्या गोष्टींत दोषी ठरवीत नाही, जी त्याला बरोबर व चांगली भासते. 23 जो मनुष्य शंका धरून खातो, तो दोषी
ठरविला गेला आहे, कारण त्याचे आचरण विश्वासावर टिकलेले नाहीये. जो व्यवहार विश्वासाने नाही, तो अपराध आहे
(ठरतो).

# 15

1 आपण जे बलवान आहोत, आपण अशक्त (संवेदनशील) लोकांना आधार द्यावयास हवा, स्वतःला प्रसन्न करून
घेण्याची संधी आपण शोधीत बसता कामा नये. 2 आपल्यांपैकी प्रत्येकाने आपल्या शेजाऱ्याचे हित विचारात घ्यावे
आणि त्याला स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. 3 येशूंनीही आपल्या स्वतःला प्रसन्न करून घेण्याची इच्छा बाळगली नाही.
जसे लिहिले आहे, ‘जे तुमची निंदा व अनादर करितात त्यांचा अनादर माझ्यावर आला आहे.’
4 ज्या गोष्टी पूर्वी लिहिल्या गेल्या होत्या, त्या यासाठी होत्या की आपण शिकावे, जेणेकरून आपण धीर व वचन यांनी
धाडस मिळवून आशा बाळगावी.
5 आता धीर आणि प्रोत्साहनाच्या परमेश्वराने, तुम्हां सर्वांना एकमेकांकरिता ख्रिस्त येशूंच्या नमून्यासारखी सहानुभूति
द्यावी; 6 यासाठी की तुम्ही सर्वांनी एकमन आणि एकमुखाने प्रभू येशू ख्रिस्तांच्या पित्याचा, गौरव व आदर करावा,
7 यास्तव जसा येशूंनी परमेश्वराच्या सन्मानाप्रीत्यर्थ तुमचा स्वीकार केला आहे, तसाच तुम्हीही एकमेकांचा स्वीकार
करा. 8 आता मी असे सांगतो, की ‘येशू ख्रिस्त, परमेश्वराच्या सत्याकरिता यहूदी लोकांचे सेवक झालेत, याकरिता की
पूर्वजांना दिलेल्या वचनाची पुष्टि व्हावी, 9 आणि हे देखील की गैरयहूदी लोकांनी परमेश्वरी कृपेकरिता परमेश्वराचीच
स्तुति करावी.’ जसे लिहिले आहे की, ‘याच कारणास्तव गैरयहूदी लोकांसमोर मी तुमचा अंगिकार करीन आणि
आपल्या नांवाचे गीत गाईन; 10 पुन्हा तो पुढे म्हणतो, “अहो गैरयहूदी लोकांनो, परमेश्वराच्या प्रजेबरोबर (यहूदी

लोकांबरोबर) आनंदित व्हा, 11 पुन्हा एकदा, अहो सर्व गैरयहूदीयांनो याहवेची स्तुति करा, सर्व लोक त्याचा आदर व
महिमा करोत.” 12 पुढे आणखी, यशया संदेष्टा म्हणतो, “इशायाचा (दावीद) वंश सर्वदा कायम राहील. याहवे गैरयहूदी
लोकांवर शासन करील, गैरयहूदी त्याच्यावर विश्वास ठेवतील.”
13 विश्वास ठेविल्यामुळे आता, आशेचे दाता येशू तुम्हांला आनंद व शांतिने विपुल करतील यासाठी की तुम्ही पवित्र
आत्म्याच्या शक्तीने, आशेने गच्च भरून जावे.
14 माझ्या भाऊबहिणींनो, मी स्वतः तुमच्याविषयी निश्चिंत आहे, की तुम्ही देखील चांगुलपणाने आणि ज्ञानाने विपुल
व्हाल आणि एकमेकांना शिकविण्यास पात्र (समर्थ) ठराल . 15 तरीपण भाऊबहिणींनो, परमेश्वरपित्याच्या कृपेमुळे काही
विषयांसंबंधित बाबींमुळे, मी मोठ्या हिंमतीने स्मरण करून देण्यासाठी असे लिहिले आहे, की 16 ‘मी गैरयहूदी
लोकांमध्ये येशूवार्ता देणारा ख्रिस्तांचा सेवक होऊन, पवित्र आत्म्याद्वारे शुद्ध केल्यामुळे, गैरयहूदी लोकां प्रत समर्पित
व्हावे व ग्रहणीय ठरावे.
17 म्हणून परमेश्वराच्या गोष्टींसंबंधाने आनंदित होण्यासाठी, येशू ख्रिस्त हे स्वत:च माझ्याजवळ असलेले मुख्य कारण
आहेत. 18 गैरयहूद्यांना आज्ञाकारी करण्याकरिता, ख्रिस्तांनी ज्या गोष्टी माझ्याद्वारे केल्या नाहीत, त्यांतील कोणतीही गोष्ट
सांगण्याचे धाडस मी करणार नाही; 19 यासाठी की जे वचन व जी कार्यशक्ति, अद्‌भुत कृत्यांद्वारे आणि चिन्हांद्वारे
दाखविली गेली होती, ती ख्रिस्तवार्ता मी कोणत्याही मर्यादेशिवाय, यरूशलेम आणि बाहेरच्या जिल्ह्यात पूर्ण परिश्रमाने
इल्लू - रिकमापर्यंत गाजविली आहे. 20 मी आपले लक्ष्य अशा प्रकारे साधण्याचे ठरविले आहे की कोणत्याही दुसऱ्या
मनुष्याच्या पायावर इमारत बांधू नये, म्हणून जेथे जेथे ख्रिस्तांचे नांव पोहचले नाही, तेथे तेथे येशूवार्ता पोहंचवावी.
21 परंतु असे लिहिले आहे की, ‘ज्यांच्याविषयी सांगितले गेले नाही ते पाहातील, ज्यांनी ऐकले नाही ते समजतील.’
22 याच कारणास्तव देखील मी तुमच्याजवळ येऊ शकलो नाही. 23 परंतु या सर्व क्षेत्रांत येशूवार्ता पोहचविण्याची आणि
पुष्कळ वर्षांपासून तुमची भेट घेण्याची इच्छा असल्यामुळे मी स्पेन आल्यावर तुमची भेट घेईन. 24 तुमच्याबरोबर वेळ
घालविण्याच्या आशेने मी काही दिवस तुमच्या सहवासात राहीन आणि त्यानंतर तुम्ही मला पुढे पोहचवून द्याल.
25 आता मी यरूशलेमेच्या पवित्र लोकांच्या सेवेकरिता तेथे जातो आहे, 26 कारण मासेदोनिया आणि अखयाच्या
लोकांना हे बरे वाटले होते, की त्यांनी यरूशलेमेच्या पवित्र लोकांतील गरीबांसाठी काही आर्थिक दान गोळा करावे;
27 खरे पाहिले तर, त्यांना हे बरें वाटले आणि ते यरूशलेमेच्या लोकांचे कर्जदार देखील आहेत, कारण जर गैरयहूदी
लोकांना त्यांच्यापासून आत्मिक लाभ झाला आहे, तर त्यांनी त्यांना आर्थिक मदत करावी हे त्यांचे कर्तव्य आहे.
28 म्हणून जेव्हा मी हे कार्य पूर्ण करून घेईन आणि त्यांना हे आर्थिक साहाय्य प्राप्त होऊन जाईल, तेव्हा तुमच्याकडे
येऊन त्यानंतर मी स्पेन देशास जाईन. 29 मला खात्री आहे की ज्या वेळी मी तुमच्याकडे येईन, त्या वेळी ख्रिस्तवार्तेच्या
आशीर्वादाच्या विपुलतेने भरलेला असा मी तुमच्याकडे येईन.
30 मी येशू ख्रिस्तांच्या नांवाने आणि पवित्र आत्म्याच्या प्रेमाखातर तुम्हांला विनंती करितो, की माझ्यासाठी
परमेश्वराकडे प्रार्थना करण्यात खूप प्रयत्न (धडपड) करीत रहा. 31 केवळ याचकरिता की यहूदीया नगरात, अविश्वासीं
लोकांच्या हातून माझी सुटका व्हावी, आणि यरूशलेमेसाठीची माझी सेवा पवित्र लोकांनी स्वीकारावी. 32 परमेश्वराच्या
इच्छेद्वारे मी मोठ्या आनंदाने तुमच्याजवळ यावे आणि तुम्हीही उत्साहित होऊन जावे.
33 आता शांतीचा पिता, तुम्हां सर्वांबरोबर असो. होय असेच होवो.

# 16

1 किंख्रियाच्या चर्चमध्ये फीबी नांवाची एक बहीण आहे जी स्तुति योग्य आहे. 2 पवित्र लोकांनी जसे करावे, तसे
अनुसरून या बहिणीचा स्वीकार करा आणि तिची जी काही गरज आहे, त्यांत तिला साहाय्य करा. कारण ती
माझ्यासाठी आणि दुसऱ्यांसाठीही साहाय्य करणारी मदतगार ठरली आहे.
3 विश्वासीं प्रिस्क व अक्विला माझे मदतगार आहेत. 4 आणि माझ्याकरिता हुतात्मा (शहीद) होण्यासाठी ते तयार होते.

केवळ त्यांच्याप्रत नव्हे, तर सर्व गैरयहूदी चर्चचा मी आभारी आहे.
5 याच प्रकारे त्यांच्या घरी जे चर्च आराधना करिते, त्यांना माझा आशीर्वाद. माझा प्रिय अपैनत, जो आशिया देशांत ख्रिस्तांजवळ येण्याऱ्यांमध्ये प्रथमफळ आहे याला माझा सलाम.
6 मरीया जिने आमच्यासाठी खूप श्रम केलेत तिला आशीर्वाद.
7 अंद्रोनीक व युनिया जे माझे नातेवाईक आणि सोबतीचे कैदी आहेत, जे प्रेषित व माझ्या दृष्टीत प्रमुख (विशेष महत्वाचे) आहेत, त्यांना शांति मिळो.
8 आंप्लियात, जो येशूंठायी माझा लाडका आहे त्याला आशीर्वाद.
9 उर्बान आणि स्ताखु जे ख्रिस्तांत माझे अतिप्रिय आहेत, त्यांना माझा आशीर्वाद.
10 अपिल्लेस आणि अरिस्तबूलाच्या कुटुंबाला आशीर्वाद.
11 माझा नातलग हेरोदियोन याला आशीर्वाद. नार्किसाच्या कुटुंबाला जे येशूंत स्थिर आहे, आशीर्वाद.
12 त्रुफैना, त्रुफासा ज्या येशूंसाठी परिश्रम करितात त्यांना आशीर्वाद. पर्सिस जिने येशूंसाठी कठीण परिश्रम केलेत तिला माझा सलाम सांगा.
13 ख्रिस्तांत निवडलेले, रूफ आणि त्याची आई यांना आशीर्वाद.
14 असुंक्रित, फलगोन, हर्मेस, पत्रबास, हर्मास आणि जे भाऊ त्यांच्याबरोबर आहेत, त्यांना आशीर्वाद.
15 फिललग व युलिया, नीरिय आणि तिची बहीण ओलुंपास आणि जे पवित्र लोक त्यांच्याबरोबर आहेत त्यांना माझा सलाम.
16 गळयात गळे घालून एकमेकांवर असलेले प्रेम दाखवा. येशू ख्रिस्तांचे सर्व चर्च तुम्हांला आशीर्वाद देतात.
17 हे भाऊबहिणींनो, मी तुम्हांला विनंती करितो की जे लोक तुमच्यामध्ये दिलेल्या शिक्षणाविपरित फुटी व सेवेंत
अडथळें आणतात, त्यांना नीट ओळखून घ्या आणि त्यांच्यापासून लांब (दूर) रहा. 18 कारण अशा वृतीचे लोक आपल्या
ख्रिस्त येशूंची सेवा करीत नाहीत परंतु ते आपल्या पोटाची सेवा करितात. ते आपल्या तोंडपुजेपणाने (हांजीहांजी) गोड
बोलून साध्या-सरळ लोकांना धोका देतात. 19 तुमच्या आज्ञाधारकपणाविषयी सर्व लोकांत तुमचे सुनाम झालेले आहे,
म्हणून मी तुमच्याविषयी आनंदी आहे, तरीरी तुम्ही चांगुलपणासंबंधी शहाणपण दाखवावे आणि वाईटाविषयी भोळया
भावाचे असावे हे मला हवे (इच्छा) आहे.
20 आणि शांतीदाता परमेश्वर लवकरच (फार उशिराने नव्हे) सैतानाला तुमच्या पायांखाली चिरडून टाकील. आपले स्वामी येशू ख्रिस्त यांची असीमित कृपा तुमच्यावर कायम राहो. होय, असेच होवो.
21 माझा सहकारी तीमथ्य आणि नातलग लूक्य, यासोन आणि सोसिपतेर हे सर्व तुमच्या कुशलाची (भलेपणाची कृत्यें) कामना करितात.
22 मी जो तर्तिय, ज्याने हे पत्र लिहून दिले, त्याच्याद्वारें तुम्हांला शांति मिळो.
23 माझा व पूर्ण चर्चचा पाहूणचार करणारा गायस तुम्हांला सलाम सांगतो आहे.
24 आपले स्वामी ख्रिस्त येशू यांची असीम कृपा तुम्हांबरोबर असो.
25 माझ्या वार्तेनुसार, अर्थात ख्रिस्तांचा संदेश जो युगांयुगांपासून गुप्त होता, आता तुमच्यावर प्रगट होण्याद्वारे तुम्हांला
स्थिर करू शकतो. 26 परंतु आता सनातन परमेश्वराच्या आज्ञेने संदेष्टयांच्या लेखांद्वारे ते रहस्य पूर्णपणे पुढे (कळविले)
आलेले आहे, यासाठीच की सर्व जातींच्या (देशांच्या) लोकांनी त्यावर विश्वास ठेवावा आणि आज्ञा पाळणारे होऊन
जावे. 27 सर्वशक्तिमान परमेश्वर जो एकमेव ज्ञानी परमेश्वर आहे, येशू ख्रिस्तांद्वारे केवळ त्यालाच संपूर्ण प्रशंसा आणि
सर्व आदर मिळत राहो. होय, असेच होवो.